# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १५/३/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१७) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **१५ मार्च २००८** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ४.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१. श्री. संजय शिरसाट
२. श्री. सावंत मधुकर दामोधर
३. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
४. डॉ. आशा बिनवडे
५. श्रीमती जयश्री किवळेकर
६. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
७. श्री. अ. रशीद खान (मामु)
८. श्री. संजय जोशी
९. श्री. वसंत नरवडे पाटील
१०. श्री. मोहन मेघावाले
११. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
१२. श्री. मोरे कचरू विश्वनाथ
१३. श्री. मो. जावेद मो. इसाक
१४. श्री. अ.साजेद अ.सत्तार
१५. श्री.हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>विषय क्र. ४०८ :</u>**

दि.**५/२/२००८**(का.प.क्र.१५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

डॉ.आशा बिनवडे : मागिल बैठकीत माझ्या वार्डातील आरक्षणाच्या संदर्भात अहवाल देण्याचे आदेशीत केले होते. डी. पी. कुलकर्णी अहवाल देणार होते. अहवाल आपल्याकडे सादर झालेला आहे का?

श्री.संजय सिरसाट : पुढील बैठकीत मा.आयुक्त उप आयुक्त येतील तेव्हा त्या विषयी खुलासा घ्यावा.

श्री.पुनमचंद बमणे : दि. ५ फेब्रुवारीच्या इतिवृत्तामध्ये काही ठराव जे पंधरा टक्के कमी दराच्या आतील आहेत त्या कामांसाठी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ची अट वगळण्यात यावी, अशी दुरूस्ती करावी.

मा. सभापती : स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे पंधरा टक्के कमी दराच्या आतील कामांसाठी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ची अट वगळण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

सभागृहातील चर्चेनुसार दि. ५/२/२००८ रोजी संपन्न झालेल्या सभेतील ठराव क्र. ३४५, ३४६, ३५१ ते ३५५ मधील थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ची अट वगळण्यास मंजुरी देण्यात येते. या दुरूस्तीसह दि.५/२/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ४०९ :</u>** **(दि.२८-२-०८ च्या सभेत स्थगित ठेवलेला विषय क्र.३८२)**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगरच्या उत्तरेकडील रहिवाश्यांच्या घरांना जाण्या-येण्याकरीता रस्ता नाही. या घरांच्या पश्चिमेकडील न.भु.क्र.१२१६२/पैकी मधील खुल्या जागेतून सध्या वरील रहिवाशांचा वापर आहे. तेथील रहिवाशांनी जाण्यायेण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याची महानगरपालिकेकडे विनंती केली असून,

पाठपुरावा केला आहे. न.भु.क्र.१२१६२/पैकी या मिळकतीच्या जमीन मालकाने ४.५० मीटर रूंद Non-DP रस्त्यासाठी जागा देण्यास संमती दिली आहे. उक्त Non-DP रस्त्याचे सार्वजनिक उपयोगासाठी भूसंपादन करण्यास सर्वसाधारण सभा दि.१८/८/२००५ मधील ठराव क्र.४८/५ नुसार मान्यता दिली असून भूसंपादन करणेस येणाऱ्या अंदाजे रक्कम रू.१२.०० लाख अपेक्षीत खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्रस्तावित ४.५ मीटर Non-DP रस्त्याची मोजणी करण्यात आली असून मोजणीनुसार रस्त्याचे भूसंपादन करावयाचे क्षेत्र २७८.८० चौ.मी. आहे. Non-DP रस्त्याच्या २७८.८० चौ.मी. क्षेत्राचा देय मोबदला रितसर सर्व वजावटी करून रक्कम रू.९,३०,२७२/- एवढा होतआहे. वरील मुल्यांकनास मान्यता झाल्यास Non-DP रस्त्याच्या क्षेत्राचे रितसर खरेदीखत करून घेण्यात येईल. खरेदीखताचा एकुण अपेक्षीत खर्च रूपय २८,८००/- येईल. खरेदीखताचा खर्च ५०:५०% महानगरपालिका व मिळकतधारकांना करावयाचा आहे. मिळकत धारकाच्या मोबदला रक्कमेतून ५०% खरेदीखताचा खर्च वजा करण्यात आलेला आहे. खरेदीखत पंजीकृत करतांना देय मोबदला रक्कम रूपये ९,३०,२७२/- च्या १०% रक्कम रूपये ९३,०२७/- संबंधीत मिळकत धारकास देण्यात येईल आणि उर्वरीत ९०% रक्कम रूपये ८,३७,२४५/- उक्त रस्त्याचे २७८.८० चौ.मी. क्षेत्राची पी आर कार्डवर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

न.भु.क्र.१२१६२/पैकी मधील Non-DP रस्त्यातील जमीनीच्या भूसंपादनाच्या मुल्यांकनास व खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगरच्या उत्तरेकडील रहिवाश्यांच्या घरांना जाण्या-येण्याकरीता रस्ता उपलब्ध व्हावा याकरीता, या घरांच्या पश्चिमेकडील न.भु.क्र.१२१६२/पैकी मधील मिळकतीच्या जमीन मालकाने ४.५० मीटर रूंद Non-DP रस्त्यासाठी जागा देण्यास संमती दिल्यानुसार उक्त Non-DP रस्त्याचे सार्वजनिक उपयोगासाठी भूसंपादन करण्यास तसेच एकूण क्षेत्र २७८.८० चौ.मी. क्षेत्राचा देय मोबदला रितसर सर्व वजावटी करून रक्कम रू.९,३०,२७२/- संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

खरेदीखत पंजीकृत करतांना देय मोबदला रक्कम रूपये ९,३०,२७२/- च्या १०% रक्कम रूपये ९३,०२७/- संबंधीत मिळकत धारकास देण्यास आणि उर्वरीत ९०% रक्कम रूपये ८,३७,२४५/- उक्त रस्त्याचे २७८.८० चौ.मी. क्षेत्राची पी आर कार्डवर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झाल्यानंतर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४१० :</u>** **(दि.२८-२-०८ च्या सभेत स्थगित ठेवलेला विषय क्र.३८३)**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मौजे गारखेडा सर्व्हे नं.५१/१, आरक्षण क्रमांक १६० खुली जागा साठी आरक्षीत असून सध्या या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे कारगील वन विकसीत करण्यात येत आहे.

उक्त आरक्षणातील बाधीत मिळकतीचे सन २००७ चे शिघ्र सिध्द गणकानुसार मुल्यांकन करून खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी जे कार्यालयीन परिपत्रक आहे त्यानुसार विकास खर्च व जमीन विकास शुल्क आणि विकासकाचा फायदा २०% आणि खरेदीखताचा ५०% खर्च याची वजावट करून देय मोबदला रक्कम काढण्यात आलेली होती. त्यास बाधीत मिळकतधारक (१)श्रीमती जयतुनबी भ्र.शेख मुसा पटेल, (२)शेख श्फीक शेख मुसा, (३)नजीर खाँ बाबा खाँ यांनी आक्षेप ोतला असून विनंती केली की, त्यांची जागा विकसीत असल्यामुळे कोणतीही वजावट करण्यात येवू नये आणि ३०% दिलासा रक्कम देण्यात यावी.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी असे मान्य केले की, (अ) ३०% दिलासा रक्कम दिली जाणार नाही, (ब) विकासकाचा फायदा २०% ची वजावट करण्यात येवू नये, (क) चालु वर्ष २००८ चे शिघ्र सिध्द गणक दर रू.३४००/- नुसार मुल्यांकन करण्यात यावे, (ड) फक्त जमीन विकास शुल्क रूपये २०/- प्रती चौ.मी. ची वजावट करण्यात यावे, (इ) खरेदीखताचा खर्च महानगरपालिकेतर्फे व मिळकत धारकातर्फे ५०-५० टक्के करण्यात यावा.

करीता वरील प्रमाणे मान्यता मिळाल्यास खालील प्रमाणे देय मोबदला रक्कम होईल.

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | बाधीत क्षेत्र चौ.मी. | मा.स्थायी समितची मान्यता मिळालेला मोबदला रक्कम रू. | जमीन विकास शुल्क, विकासकाचा नफा ची वजावट न करता येणारा देय मोबदला | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५१/१ | १६७ | ३,७५,८३७/- | ५,४७,४००/- | १,७१,५६३/- |
| २ | ५१/१ | ११२ | २,५२,०४५/- | ३,६७,०००/- | १,१४,९५५/- |
| ३ | ५१/१ | ५६ | १,२७,०२२/- | १,८३,४००/- | ५६,३७८/- |
| | **एकुण** | **३३५** | **७,५४,९०४/-** | **१०,९७,८००/-** | **३,४२,८९६/-** |

करीता प्रकरणात मोबदला रक्कम संबंधीतांना अदा करण्यासाठी व खरेदी खताचा ५०% खर्च रक्कम रू.३३,०००/- बाबत प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा सर्व्हे नं.५१/१, आरक्षण क्रमांक १६० खुली जागा साठी आरक्षीत असलेल्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे कारगील वन विकसीत करण्यासाठी (१)श्रीमती जयतुनबी भ्र.शेख मुसा पटेल, (२)शेख श्फीक शेख मुसा, (३)नजीर खाँ बाबा खाँ यांनी मान्य केलेल्या प्रस्तावातील नमुद अटी शर्तीनुसार संबंधीतांना खालील प्रमाणे देय मोबदला रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | बाधीत क्षेत्र चौ.मी. | स्थायी समितची मान्यता मिळालेला मोबदला रक्कम रू. | जमीन विकास शुल्क, विकासकाचा नफा ची वजावट न करता येणारा देय मोबदला | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५१/१ | १६७ | ३,७५,८३७/- | ५,४७,४००/- | १,७१,५६३/- |
| २ | ५१/१ | ११२ | २,५२,०४५/- | ३,६७,०००/- | १,१४,९५५/- |
| ३ | ५१/१ | ५६ | १,२७,०२२/- | १,८३,४००/- | ५६,३७८/- |
| | **एकुण** | **३३५** | **७,५४,९०४/-** | **१०,९७,८००/-** | **३,४२,८९६/-** |

करीता प्रकरणात मोबदला रक्कम संबंधीतांना अदा करण्यास व खरेदी खताचा ५०% खर्च महानगरपालिकेने करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४११ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६ एन-११ येथील आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१२,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदर कामाचा खर्च सन २००७-०८ अंतर्गत नवनि उद्यान विकास या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१२,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१६ एन-११ येथील आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४१२ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, लक्ष्मणचावडी ते सिल्लेखाना रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करावयाच्या आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१९,९९,७००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केलेली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षाच्या तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रू.१९,९९,७००/- चे मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्ष्मणचावडी ते सिल्लेखाना रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९९,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.३७ अंतर्गत एस.बी. कॉलनी येथे आर सी सी पुल बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१५,००,०००/- चे आहे. या कामाचा खर्च सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पातील नवीन खडी रस्ते कल्व्हर्ट या लेखाशिर्षामधून करण्यात येणार आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.१५,००,०००/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३७ अंतर्गत एस.बी. कॉलनी येथे आर सी सी पुल बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.८ पडेगांव मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे व मेनहोल चेंबर बांधणेच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सन २००६-२००७ च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये १०,९९,२३४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची दि.३१.१.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असुन सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००७-२००८ मध्ये भांडवली कामे जलनिःसारण या शिर्षकातुन पृष्ठ क्रमांक २०८ अ.क्र.१०, ११, १२ नुसार रक्कम रूपये ११.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १०,९९,२३४/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ८ पडेगांव मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे व मेनहोल चेंबर बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१०,९९,२३४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५ :**

मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/८/२००७ ठराव क्रमांक ८५ व दि.२३/१०/२००७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१४९ अन्वये इतिवृत्त कायम करून यानुसार भूमी अभिलेख खात्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना महनगरपालिकेच्या संपादीत मिळकती भूमी अभिलेखात महानगरपालिकेच्या नावावर लावून घेण्याच्या कामी सहा महिन्याच्या मुदतीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कामावर घेणे बाबत ठराव पारीत करण्यात आला आहे. सदरील ठरावातील एकुण ६ सेवानिवृत्त भूमी अभिलेख खात्यातील कर्मचाऱ्यांपैकी चार कर्मचाऱ्यांची कामाची मुदत दिनांक १५ फेब्रुवारी रोजी व २ कर्मचाऱ्यांची कामाची मुदत दिनांक २६ मे २००८ रोजी संपत आहे. करीता विशेष कक्षाचे काम चांगल्या पध्दतीने सुरू असून एकूण ६९४ मिळकतींची मालकी महानगरपालिकेच्या नांवे लावण्यासाठी नगर भूमापन कार्यालय व तहसील कार्यालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. सातत्याने पाठपुरावा करून विशेष कक्षाने ४११ मिळकतींवर महानगरपालिकेच्या नावाची नोंद घेण्यात यश मिळविले आहे. उर्वरीत मिळकतींवर महानगरपालिकेचे नांव लावून घेणे तसेच प्रत्यक्षात या मिळकतींचे मोजमाप करणे, जागेच्या सिमा मालमत्ता विभागास निश्चित करून देणे इत्यादी कामासाठी या पथकातील भूमी अभिलेख खात्यातीज सहा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या सध्याच्या आदेशाच्या मुदतीनंतर पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भूमी अभिलेख खात्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना महनगरपालिकेच्या संपादीत मिळकती भूमी अभिलेखात उर्वरीत मिळकतींवर महानगरपालिकेचे नांव लावून घेणे तसेच प्रत्यक्षात या मिळकतींचे मोजमाप करणे, जागेच्या सिमा मालमत्ता विभागास निश्चित करून देणे इत्यादी कामासाठी या पथकातील भूमी अभिलेख खात्यातील सहा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या सध्याच्या आदेशाच्या मुदतीनंतर पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्यासाठी मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.सीआर/७४/औबाद/२००७/१८४, दि.१७/१/२००८ नुसार आरोपी लोकसेवक श्री.भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता तथा प्र. वॉर्ड अभियंता, वॉर्ड-अ कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरूध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या प्रकरणाच्या तपासाचे संपूर्ण कागदपत्रांच्या नकलांचा संच पाठविलेला आहे. सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधीत श्री.भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता तथा प्र. वॉर्ड अभियंता, वॉर्ड-अ कार्यालय यांच्या विरूध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी पुरेसा पुरावा दिसून येत असल्याने संबंधिताविरूध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : मंजूरी दिली नाही तर पुढे काय होईल खुलासा घ्यावा.

विधी सल्लागार : मा.न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करण्याचा अधिकार मा. स्थायी समितीच्या अंतर्गत असल्यामूळे सदर प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर कार्यवाही करता येईल. मंजूरी दिली नाही तर सदर प्रस्ताव मा.आयुक्त यांना शासनाकडे पाठवावा लागेल.

मा.सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांना, श्री.भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता तथा प्र. वॉर्ड अभियंता, वॉर्ड-अ कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरूध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७ :**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहेत की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद येथे औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने काम करण्यासाठी शहरात एकुण ३ फायर स्टेशन कार्यरत आहेत. या ३ अग्निशमन केंद्र चालविण्यासाठी मनपा व एमआयडीसी चे खालील प्रमाणे वाहने कार्यरत आहेत. एक अग्निशमन केंद्र कर्मचाऱ्यांअभावी बंद आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | मॉडेल | खरेदीचे वर्ष | स्वामीत्व |
|---|---|---|---|---|
| १. | MCA - २१२५ | Tata-१२१० Fire Tender | १९८३ | AMC |
| २. | MH-२०/A-२५२४ | Tata-१२१० Fire Tender | १९९० | AMC |
| ३. | MH-२०/A-२०५२ | Tata-१२१० Fire Tender | १९९० | MIDC |
| ४. | MH-२०/A-५८०४ | Tata-१२१० Fire Tender | १९९३ | AMC |
| ५. | MH-०४/H-८०१८ | Fire Water Tanker | १९९३ | MIDC |
| ६. | MH-०४/H-८०२७ | Foam Tender | १९९३ | MIDC |

आपत्कालीन व्यवस्थापन केंद्रा अंतर्गत अग्निशमन विभागास औरंगाबाद जिल्ह्यासह जालना व बीड जिल्ह्यासाठीही काम करावयाचे आहे. तथापी मनपा अग्निशमन विभागाकडे अपुरी साधनसामुग्री असल्याने दोन फायर टेंडर खरेदी करणे आवश्यक आहे. १२ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून दोन फायर टेंडर वासन ऑटोमोटीव्ह प्रा.लि. वाळूज, औरंगाबाद यांच्याकडून प्रत्येकी रू.८,७०,४४३/- प्रमाणे दोन चेसीससाठी रू.१७,४१,२८६/-(अक्षरी रू.सतरा लाख एक्केचाळीस हजार दोनशे शहाऐंशी फक्त) खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : केंव्हापासून एक केंद्र बद आहे कुणाच्या रिपोर्टवरून बंद केले चालू असेल तर तेथील कर्मचारी कुठे दिले व कोणते कर्मचारी कमी पडत होते. खुलासा द्यावा.

अग्निशमन अधिकारी : एमआयडीसी चिकलठाणा भागातील एक केंद्र कर्मचारी कमी असल्यामूळे संध्या बद आहे. नवीन १० पदे भरण्याच्या प्रोसेसमध्ये आहे दोन वर्ष हे केंद्र

चालू होते त्यानंतर १९९६ पासून बंद आहे.नव्याने सुरू केले होते एमआयडीसी ने बांधुन दिले होते.

श्री.अ.रशिद खान : दोन वर्ष चालू होते नंतर बंद केले त्यांचा रिपोर्ट दिला का? कर्मचारी कुठे गेले.

अग्निशमन अधिकारी : रिपोर्ट प्रशासनाला केलेला आहे प्रशासनाने ५५ पदाचा पदनिर्मितीचा प्रस्ताव सध्या शासनाच्या मंजूरीसाठी आहे. १० पदे रिक्त आहे ते भरण्या बाबत कार्यवाही चालू आहे.

मा. सभापती : तात्काळ पदे भरण्याची कार्यवाही करून सदर केंद्र चालू करावे. अग्निशमन दलाकडे सध्या असलेली वाहने खुपच जुनी आहेत. तसेच वेळोवेळी आग विझ ाविण्याकरीता अग्निशमन वाहने कमी पडत आहे. म्हणून आणखी दोन अतिरिक्त वाहने खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.१७,४१,२८६/- च्या अतिरिक्त खर्चासह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद येथे औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने काम करण्यासाठी, वासन ऑटोमोटीव्ह प्रा.लि. वाळूज, औरंगाबाद यांच्याकडून प्रत्येकी रू.८,७०,४४३/- प्रमाणे खरेदी करण्यास दोन चेसीससाठी लागणाऱ्या र.रू.१७,४१,२८६/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे अग्निशमन दलाकडे सध्या असलेली वाहने खुपच जुनी आहेत. तसेच वेळोवेळी आग विझविण्याकरीता अग्निशमन वाहने कमी पडत आहे. म्हणून आणखी दोन अतिरिक्त वाहने खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या र.रू. १७,४१,२८६/- च्या अतिरिक्त खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सन २००७-०८ सालाकरीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संदर्भात रू.२७,०४,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे.

वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संबंधी ई-निविदा विभागामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदा प्रक्रिये अंतर्गत या पुरवठ्या करीता एकुण तीन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी एकच निविदा प्राप्त झाली. त्याचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| रंग रसायन | १) a) ९०० कि.ग्रॅम सिलेंडर - रू.९३५१.००/प्रती मे.टन<br>b) १०० कि.ग्रॅम सिलेंडर-रू.५००००.००/प्रती मे.टन |
| | २) हायड्रॉलीक टेस्टींग - रू.२५००.००/प्रती सिलेंडर |

या दराने खरेदी केल्यास खालील प्रमाणे खर्च होईल.

| | | |
|---|---|---|
| १) a) ९०० कि.ग्रॅम सिलेंडर करीता | १९६ मे.टन x रू.९३५१.०० प्र.मे.टन = | १८,३२,७९६.०० |
| b) १०० कि.ग्रॅम सिलेंडर करीता | १.८ मे.टन x रू.५००००.०० प्र.मे.टन = | ९०,०००.०० |
| २) हायड्रॉलीक टेस्टींग | २३ सिलेंडर xरू.२५००.०० प्र.सिलेंडर = | ५७,५००.०० |
| | | १९,८०,२९६.०० |

तुलनात्मकदृष्ट्या

१. अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २६.७६% कमी दर आहेत.

२. मागच्या वर्षीच्या मंजुर पुरवठा दराशी तुलना केली असता दर १२.४४% कमी येतात.

मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने खरेदी करण्याची शिफारस केली असून प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यासाठी आदेशीत केले आहे. करीता रंग रसायन यांची निविदानुसार उपरोक्त दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००७-०८ सालाकरीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्याकरीता प्राप्त झ ालेल्या **रंग रसायन** यांच्या निविदा दरानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) a) ९०० कि.ग्रॅम सिलेंडर करीता<br>b) १०० कि.ग्रॅम सिलेंडर करीता | १९६ मे.टन x रू.९३५१.०० प्र.मे.टन =<br>१.८ मे.टन x रू.५००००.०० प्र.मे.टन = | १८,३२,७९६.००<br>९०,०००.०० |
| २) हायड्रॉलीक टेस्टींग | २३ सिलेंडर xरू.२५००.०० प्र.सिलेंडर = | ५७,५००.०० |
| | | १९,८०,२९६.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन ओव्हरब्रीज ते सादतनगर पर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१६,५४,७००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.८१ दि. ७/८/२००७ च्या बैठकीत मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षातुन करण्यात येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना जा.क्र./१३२/२००७, काढण्यात येवून ई-निविदे द्वारे बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम वेळेपर्यंत एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकारण्याच्या निर्धारीत वेळेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा खालील प्रमाणेची आहे.

१. श्री. पी. बी. पाटील अं.प.दरापेक्षा ६४.९८% जास्त दराने

वरीलप्रमाणे एकच निविदा असून ती श्री.पी.बी. पाटील यांची असून अं.प.दरापेक्षा ६४.९८% जास्त दराची आहे. मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांचे दि.७/१२/२००७ चे डीआयके पाईपचे मुळ दरात २% जकात, ४% व्हॅट, २.३% आय.टी., १% विमा, ०.५% अनलोडींग, ५% ओव्हरहेड खर्च असे एकूण १४.८% म्हणजेच १५% अधिक मिळवून आलेल्या दरानुसार या कामासाठी लागणारा खर्च काढून मुळ निविदा रक्कमेशी तुलना केली असता तो अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५५.८२% जास्त एवढा येतो. श्री.पी.बी.पाटील यांना उक्त दर आपणांस मान्य आहे किंवा कसे याबाबत पत्र देवून विचारणा केली असता त्यांनी दि.३१/१२/२००७ रोजी पत्र देवून ५५.८२% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता श्री. पी.बी. पाटील यांनी लेखी दिलेल्या संमतीनुसार अं.प.दरापेक्षा ५५.८२% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : माहिती द्यावी किंवा स्थगित ठेवावे.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२० :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर, बहादुरपुरा, बापुनगर भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१०,९९,७८८/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.११२ दि.४/९/२००७ च्या बैठकीत मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षातुन करण्यात येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना जा.क्र./१८२/२००७, काढण्यात येवून ई-निविदे द्वारे बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम वेळेपर्यंत एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकारण्याच्या निर्धारीत वेळेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा खालील प्रमाणेची आहे.

१. मे. दिप इन्टर प्रायझेस् अं.प.दरापेक्षा ५८.९१% जास्त दराने

वरीलप्रमाणे एकच निविदा असून ती मे. दिप इन्टर प्रायझेस् यांची असून अं.प.दरापेक्षा ५८.९१% जास्त दराची आहे. मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांचे दि.७/१२/२००७ चे डीआयके पाईपचे मुळ दरात २% जकात, ४% व्हॅट, २.३% आय.टी., १% विमा, ०.५% अनलोडींग, ५% ओव्हरहेड खर्च असे एकूण १४.८% म्हणजेच १५% अधिक मिळवून आलेल्या दरानुसार या कामासाठी लागणारा खर्च काढून मुळ निविदा रक्कमेशी तुलना केली असता तो अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५०.०९% जास्त एवढा येतो. मे. दिप इन्टर प्रायझेस् यांना उक्त दर आपणांस मान्य आहे किंवा कसे याबाबत पत्र देवून विचारणा केली असता त्यांनी दि.२५/१/२००८ रोजी पत्र देवून ५०.०९% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता मे.दिप इंन्टरप्रायझेस् यांनी लेखी दिलेल्या संमतीनुसार अं.प.दरापेक्षा ५०.०९% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : स्थगिती द्यावी.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२१ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.६९ अंतर्गत भगवती कॉलनी, लोकमित्र कॉलनी, स्नेहवर्धिनी कॉलनी व इतर भागात १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१९,६१,९७९/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.२१६ दि.२७/११/२००७ च्या बैठकीत मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षातुन करण्यात येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना जा.क्र./१५२/२००७, काढण्यात येवून ई-निविदे द्वारे बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम वेळेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या निर्धारीत वेळेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. एस. बी. साधवाणी | अं.प.दरापेक्षा ५४.५०% जास्त दराने |
| १. श्री. पी. बी. पाटील | अं.प.दरापेक्षा ५४.९९% जास्त दराने |

वरीलप्रमाणे कमी दराची निविदा श्री.एस.बी. साधवाणी यांची असून अं.प.दरापेक्षा ५४.५०% जास्त दराची आहे. मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांचे दि.७/१२/२००७ चे डीआयके पाईपचे मुळ दरात २% जकात, ४% व्हॅट, २.३% आय.टी., १% विमा, ०.५% अनलोडींग, ५% ओव्हरहेड खर्च असे एकूण १४.८% म्हणजेच १५% अधिक मिळवून आलेल्या दरानुसार या कामासाठी लागणारा खर्च काढून मुळ निविदा रक्कमेशी तुलना केली असता तो अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५६.९०% जास्त एवढा येतो. त्यामुळे श्री.सुरेश बी. साधवाणी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५४.५०% जास्त दराची निविदा स्विकृतीस मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता श्री. एस. बी. साधवाणी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५४.५०% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६९ अंतर्गत भगवती कॉलनी, लोकमित्र कॉलनी, स्नेहवर्धिनी कॉलनी व इतर भागात १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा ५४.५०% जास्त दराची श्री.एस.बी. साधवानी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रस्ताव सादर करीत आहेत की, जळगांव रस्त्यामध्ये बाधीत होत असलेली ३०० व ३५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी काढणे व २५० व ४०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००६-०७ नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.५८,९९,३४१/- चे तयार करण्यात आलेले असून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.७४४ दि.२०/२/२००७ अन्वये मान्यता झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखेला दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. एल. के. कन्स्ट्रक्शन | ३९.००% जास्त दराने |
| २. उदय इंजिनिअरींग वर्क्स | ४३.००% जास्त दराने |

प्राप्त निविदामध्ये कमी दराची निविदा एल.के. कन्स्ट्रक्शन यांची असून अं.प.दरापेक्षा ३९.००% जास्त दराची आहे. त्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ३९.००% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : स्थगिती द्यावी.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२३ :**

कार्यकारी अभियंता(ज.नि.वि.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.४७ मधील खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी रकम रू.१४,३७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.२१७ दि.२७.११.२००७ अन्वये मान्यता झालेली आहे. त्याप्रमाणे कामासाठी निविदा सूचना जा.क्र.१६९ दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून ई-निविदेद्वारे बी-१ निविदा मागविण्यात आल्या असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | २१.९०% कमी दराने |
| २. | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | १७.३०% कमी दराने |
| ३. | श्री. आर. के. पटेल | १४.८८% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची असून अं.प.दरापेक्षा २१.९०% कमी दराची आहे. त्यास मा.आयुक्त यांची मान्यता आहे. करीता श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अं.प.दरापेक्षा २१.९०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४७ मधील खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९०% कमी दराची श्री. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.६९ जवाहर कॉलनी, शास्त्रीनगर, स्नेहवर्धिनी कॉलनी, आरोग्य केंद्र परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,७६,१४८/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत सात निविदा विक्री झाल्या होत्या, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत सात निविदा प्राप्त झाले असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | २१.००% कमी दराने |
| २. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | १७.८९% कमी दराने |
| ३. | मोना कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| ४. | अ. कादिर शेख रहिम | १७.०३% कमी दराने |
| ५. | महेश युवराजसिंग राजपुत | १५.२०% कमी दराने |
| ६. | संतोष रत्नाकर झाल्टे | १३.८८% कमी दराने |
| ७. | उदय इंजिनियरींग वर्क्स | ९.९९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचे असून त्यांच्या निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.००% कमी असून त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६९ जवाहर कॉलनी, शास्त्रीनगर, स्नेहवर्धिनी कॉलनी, आरोग्य केंद्र परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २१.००% कमी दराची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, मो. लक्ष्मीनगर गारखेडा अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,७२,१३७/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा विक्री झाल्या होत्या, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाले असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश १८.९०% कमी दराने
२. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन १७.८७% कमी दराने
३. अ. कादिर शेख रहिम १६.११% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचे असून त्यांच्या निविदेचा दर अं.प.दरापेक्षा १८.९०% कमी असून त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापि विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. लक्ष्मीनगर गारखेडा अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १८.९०% कमी दराची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे रक्कम रू.१४,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदर कामाचे निविदापत्रके मागविण्यात आले असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ५ निविदापत्रके विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश १५.६०% कमी दराने
२. प्रसन्ना दत्तात्रय उगले १५.२२% कमी दराने
३. एम. ए. सईद १२.३०% कमी दराने
४. खॉन रईस अहेमद सरदार अहेमद खान १०.८०% कमी दराने
५. आदिनाथ कन्स्ट्रक्शन १०.७६% कमी दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १५.६०% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १५.६०% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १५.६०% कमी दराची श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९५ पदमपुरा अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.१६.८० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.२१४ दि.२७.११.२००७ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ निविदा विक्री झाल्या व २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१. उदय इंजिनिअरींग वर्क्स १३.९९% कमी दराने
२. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश ९.००% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा १३.९९% कमी दराची निविदा उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अं.प.दरापेक्षा १३.९९% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : स्थगिती द्यावी.
मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.९० एकनाथ नगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.११,८५,३६४/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या होत्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाले असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | एम. ए. सईद | १२.७०% कमी दराने |
| २. | श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | ९.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री. एम. ए. सईद यांचे असून त्यांच्या निविदेचा दर अं.प.दरापेक्षा १२.७०% कमी असून त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापि विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९० एकनाथ नगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सईद यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १२.७०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.९८ अंतर्गत कांचनवाडी येथे श्री.शेकुदादा मोटे यांच्या घरापासुन ते मनपा हद्दीपर्यंत कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१०,४९,०००/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली होती, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली असून त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. ऋषिकेश कन्स्ट्रक्शन अ.प.दरापेक्षा १५.००% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांच्या निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त असुन त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापी विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान मामू : कॉक्रीट रस्ता तयार करणार असे दिले मोटे घरापासून खुली जागा की वस्ती आहे याचा उल्लेख नाही. वस्ती नसतांना रस्ता केल्यास तेथील जमिनीचे किमती वाढतील.

अति.शहर अभियंता : गल्लीचा रस्ता आहे. मोकळी जागा नाही.

मा.सभापती : मजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९८ अंतर्गत कांचनवाडी येथे श्री.शेकुदादा मोटे यांच्या घरापासुन ते मनपा हद्दीपर्यंत कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेली ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.६९ अंतर्गत अशोकनगर ते सारंग सोसायटीपर्यंत बी.टी.रोड व फुटपाथ तयार करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२२,६७,५१४/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा विक्री झाल्या होत्या, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाले असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.८२% कमी दराने |
| २. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ७.८६% जास्त दराने |
| ३. | रे कन्स्ट्रक्शन | ११.११% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे असुन त्यांच्या निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८२% कमी असुन त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापि विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६९ अंतर्गत अशोकनगर ते सारंग सोसायटीपर्यंत बी.टी.रोड व फुटपाथ तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८२% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.३६ नागेश्वरवाडी येथील खडकेश्वर, कोतवालपुरा, काबरा गार्डन व इतर ठिकाणी रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामाकरीता अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन रक्कम रू.१४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा ठराव क्र.२५६ दि.३१/१२/२००७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरून प्राप्त झाल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. | १३.८९% कमी दराने |
| २. | मे.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | १२.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८९% कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांची आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. तरी मे.आदीनाथ क.कं. यांची अं.प.दरापेक्षा १३.८९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३६ नागेश्वरवाडी येथील खडकेश्वर, कोतवालपुरा, काबरा गार्डन व इतर ठिकाणी रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.११ मेडीकल कॉलेज हॉस्पीटल परिसरात फुटपाथ तयार करणे या कामाचे रक्कम रू.११,९७,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ निविदा विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ७ निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | २२.६०% कमी दराने |
| २. | अब्दुल कदीर शेख रहीम | १९.१९% कमी दराने |
| ३. | उदय इंजिनियरींग वर्क्स | १८.९९% कमी दराने |
| ४. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १३.७६% कमी दराने |
| ५. | चंद्रम्मा एन. आशन्ना | ११.११% कमी दराने |
| ६. | एम. ए. सईद | १०.१०% कमी दराने |
| ७. | खॉन रईस अहेमद सरदार अहेमद खान | ०१.१७% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २२.६०% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा २२.६०% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : तुर्त स्थगिती द्यावी.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.८८ जयविश्वभारती कॉलनी मुख्य रस्त्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या

रक्कम रू.११,५७,६०२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण २ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी २ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १२.९९% जास्त दराने |
| २. | रे कन्स्ट्रक्शन | १४.९९% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा १२.९९% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता १५.८८% जास्त दर येत आहेत. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजार भाव दरापेक्षा कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% जास्त दर आहेत. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.१३,०७,९७४.५० एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८८ जयविश्वभारती कॉलनी मुख्य रस्त्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% जास्त दराची आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, ह. शहाशोक्ता दर्गा जवळील नदीवर आर.सी.सी. मेजर ब्रिज बांधण्याकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.१,८३,८४,८३७/- चे कामाची दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता एक निविदा दर भरून प्राप्त झाली.

रे कन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा ५६% जास्त दराची प्राप्त होती. नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना दर पृथःकरण करणेबाबत कळविले असता त्यांनी दर पृथःकरण करून ५२.९१% ची वाढ झाली असल्याचे सुचविले आहे.

मा. आयुक्त यांनी गुत्तेदारास समक्ष वाटाघाटी करीता बोलविले असता गुत्तेदाराने सध्या सर्व साहित्य जसे की, लोखंड, सिमेंट, रेती, खडी इत्यादी साहित्याची भरमसाठ वाढ झाली असल्याचे निदर्शनास आणून दिले. वरील बाबींचा विचार करून वाटाघाटी अंती गुत्तेदाराने ४६% जास्त दराने काम करण्यास सम्मती दर्शविली. त्यानुसार सदर कामाची मे. रे कन्स्ट्रक्शन लि. यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हजरत शहाशोक्ता दर्गा जवळील नदीवर आर.सी.सी. मेजर ब्रिज बांधण्याकरीता प्राप्त झालेले निविदाधारक रे कन्स्ट्रक्शन लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम रे कन्स्ट्रक्शन लि. यांचेकडून अं.प.दरापेक्षा ४६% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. ६२ अंतर्गत म्हाडा कॉलनी, भाग्यनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी रक्कम रू.१४,९८,०५०/- चे अंदाजपक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ५ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ४ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | के. बी. पाथ्रीकर | १४.२१% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.१०% जास्त दराने |
| ३. | राजेंद्रसिंग अजितसिंग | १८.१८% जास्त दराने |
| ४. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ३०.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी के.बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.२१% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता २३.९०% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजारभाव दरापेक्षा कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा १४.२१% जास्त दर आहे. त्यामुळे सदरील कामावर रक्कम

रू.१७,१०,९२३/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के.बी.पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.२१% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , प्रभाग क्र.६२ अंतर्गत म्हाडा कॉलनी, भाग्यनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १४.२१% जास्त दराची के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.८० अंतर्गत प्रभागामधून जाणाऱ्या २४ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,९५,४००/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | के. बी. पाथ्रीकर | १७.५१% जास्त दराने |
| २. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.००% जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २१.२१% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी के.बी.पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७.५१% ने जास्त दर आहेत. बाजारभावात डांबराचे भाव वाढल्यामुळे उपरोक्त १७.५१% जास्त दरामुळे या कामावर रक्कम रू.२३,४४,७११/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के.बी.पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १७.५१% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८० अंतर्गत प्रभागामधून जाणाऱ्या २४ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७.५१% जास्त दराची के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.२५ अयोध्यानगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,९८,१००/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | अरोरा कन्स्ट्रक्शन | १७.६६% जास्त दराने |
| २. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १८.००% जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २१.२१% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७.६६% ने जास्त दर आहेत. सध्या बाजारात डांबराचे भाव वाढल्यामुळे उपरोक्त १७.६६% जास्त दराने काम केल्यास या कामावर रक्कम रू.१५,१२,१७४/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १७.६६% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२५ अयोध्यानगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.६६% जास्त दराची अरोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.६ बेगमपुरा येथील पेठेनगर, ब्राम्हणगल्ली इत्यादी ठिकाणी रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी रक्कम रू.१८,९९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ५ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ४ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १५.००% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.१०% जास्त दराने |
| ३. | राजेंद्रसिंग अजितसिंग | १८.१८% जास्त दराने |
| ४. | के. बी. पाथ्रीकर | २५.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता २३.३७% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजारभाव दरापेाा कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा १५.००% जास्त दर आहे. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.२१,८४,५४०/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६ बेगमपुरा येथील पेठेनगर, ब्राम्हणगल्ली इत्यादी ठिकाणी रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुष्पनगरी स्मशानभुमीच्या रस्त्याची लेव्हल सरळ करून साचणाऱ्या पाण्याचा निचरा करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी रक्कम रू.११,३१,७३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.००% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २४.२४% जास्त दराने |
| ३. | के. बी. पाथ्रीकर | ३०.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.००% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता १३.०५% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजारभाव दरापेक्षा जास्त आहेत, यामुळे सदरील कामावर रक्कम रू.१२,७९,४२६/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.०५% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुष्पनगरी स्मशानभुमीच्या रस्त्याची लेव्हल सरळ करून साचणाऱ्या पाण्याचा निचरा करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्म्कदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.०५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील ११ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.९,९८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविले असता

एकूण ४ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ४ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.००% जास्त दराने |
| २. | के. बी. पाथ्रीकर | २१.२१% जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २१.२१% जास्त दराने |
| ४. | एम ए सिद्यीकी | २२.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २०.००% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता २४.१३% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजारभाव दरापेक्षा कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा २०.००% जास्त दर आहे. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.००% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील ११ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.००% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.१७, पवार हॉस्पीटल एम-२ रोड, एन-९ मनपा शाळा ते दुर्गा हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९६,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविले असता एकूण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १५.००% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २१.२१% जास्त दराने |
| ३. | चंद्रम्मा आशन्ना | २२.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १५.००% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता २३.३३% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजारभाव दरापेक्षा कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा १५.००% जास्त दर आहे. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.२२,७२,४८७/- एवढा खर्च होणार आहे. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , प्रभाग क्र.१७, पवार हॉस्पीटल एम-२ रोड, एन-९ मनपा शाळा ते दुर्गा हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.६९ शास्त्रीनगर, विनायकनगर, समर्थ सोसायटी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९३,०३२/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदा पत्रके मागविले असता एकूण ७ निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ७ निविदापत्रके दर भरून प्रापत झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | चंद्रम्मा एन. आशन्ना | १७.००% जास्त दराने |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | १७.०१% जास्त दराने |
| ३. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.४९% जास्त दराने |
| ४. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | १७.९०% जास्त दराने |
| ५. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.५१% जास्त दराने |
| ६. | एम. ए. सिद्यीकी | २१.००% जास्त दराने |
| ७. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | २७.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी चंद्रम्मा एन. आशन्ना यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेाा १७.००% ने जास्त आहेत. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.१३,९३,०३२/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी चंद्रम्मा एन. आशन्ना यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १७.००% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव वाढीव खर्चासह विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६९ शास्त्रीनगर, विनायकनगर, समर्थ सोसायटी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृश्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७% जास्त दराची चंद्रम्मा एन आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा रस्त्याचे डांबरीकरण व रूंदीकरण करणे अंतर्गत एन-१भागात रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या काासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२४,९८,८३७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ५ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | राजेंद्रसिंग अजितसिंग | २१.२२% कमी दराने |
| २. | के. बी. पाथ्रीकर | १५.२१% कमी दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १४.८९% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे दर सर्वात कमी असून अं.प.दरापेक्षा २१.२२% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी राजेंद्रसिंग अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा २१.२२% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : तुर्त स्थगिती द्यावी.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको भागातील रस्त्यालगत ग्रीनबेल्ट विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.७४,९८,९३१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.९२७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण १ निविदा विक्री झाली व १ निविदा दर भरून प्राप्त झाली.

१. गोसावी एस. के. २१.२१% जास्त दराने

उपरोक्त नुसार गोसावी एस.के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२१% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली असल्या कारणाने संबंधीत गुत्तेदारास मा.आयुक्त यांच्या दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२१% जास्त दराऐवजी १२% जास्त दराने सदरील

निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. सदरील कामा अंतर्गत खालील अटी व शर्तींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. सदरील ग्रीनबेल्ट विकसीत झाल्यानंतर पुढील तीन वर्षापर्यंत निगा राखणे व देखभाल दुरूस्तीची सर्व कामे पुर्ण करणे तसेच तीन वर्षानंतर सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतर करणे संबंधीत मक्तेदारास बंधनकारक राहील.

२. सदरील ग्रीनबेल्ट अंतर्गत बसविण्यात येणारी खेळणी नामांकित रिगल/अरिहंत कंपनीची आयएसओ प्रमाणित असणे बंधनकारक राहील.

३. सदरील प्रकल्पाकरीता नियुक्त मक्तेदार एजन्सीला काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यानच्या देयकापैकी निव्वळ ७७% देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजित काम पूर्ण झाल्यानंतर संबंधिताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून रोखुन ठेवलेल्या २३% रक्कमेपैकी ५% रक्कम संबंधित देयकाच्या १ वर्षाच्या कालावधीनंतर, ६% रक्कम दोन वर्षाच्या कालावधीनंतर, ७% रक्कम तीन वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत ५% रक्कम सदरील प्रकल्प सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरण केल्याच्या ९० दिवसानंतर अदा करण्यात येईल.

त्यानुसार गोसावी एस. के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२१% जास्त दराऐवजी १२% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय सिरसाट : ग्रिनबेल्ट कुठे आहे किती आहे एरिया किती आहे, रस्त्याच्या बाजूला खेळणी लावण्याची पध्दत ही कशाच्या आधारे सुरू करीत आहोत. सविस्तर माहिती द्यावी.

कार्य.अभियंता(विद्य.ड्रे.): सिडको हस्तांतर त्यापोटी महापालिकेला १५ कोटी मिळाले त्या अंतर्गत हा विषय ठेवलेला आहे. प्रेसीडेंन्ट पार्क ते भक्ती गणेश मंरीरपर्यंत दुतर्फा फेन्सींग तुटलेली आहे. सिडकोच्या काळातील जो ग्रिनबेल्ट हाता तो पूर्णतः उध्वस्त झालेला आहे.

श्री.संजय सिरसाट : तार फेन्सींग तुटली मान्य आहे परंतू कुठे ही झाडे नाही असे प्रशासनाचे म्हणणे असेल तर चुकीचे आहे. झाडे असेल तेथे खेळणी बसविणार काय?

कार्य.अभियंता(विद्य.ड्रे.): खेळणी हा वन ऑफ द ॲटम आहे. सर्वच ठिकाणी खेळणी बसविणार नाही.

श्री.संजय सिरसाट : एकूण किती ग्रीनबेल्ट विकसीत करणार त्यांचा उल्लेखच दिला नाही.

कार्य.अभियंता (विद्य.ड्रे.): ग्रीनबेल्ट हा दोन्ही बाजूने ५००-५०० मीटर आहे सहा मीटर रूंदी असून एकूण ६०-७० हजार स्क्वेअरफुट होईल. दोन्ही बाजूने फेन्सींग करणार जाहिरात लावण्यासाठी बॉक्स सोडलेले असून जाहिरातून जे उत्पन्न येईल ते महापालिकेला मिळेल. स्ट्रीट फर्निचर बसविणार तीन वर्ष संबधीताने मेंटेन करावयाचे आहे.

श्री.संजय सिरसाट : अंदाजे लेन्थ काढलेली आहे. प्रेसीडेंन्ट पार्क ते वखार्ड पर्यत रस्ता घेतला म्हणजे सिडकोचा सर्व भाग येतो असे नाही.प्रस्ताव तयार करीत असतांना पुर्ण लेन्थ असेल तसे प्रस्तावात दिले नाही. जी झाडे असतील ती तोडणार नाही उर्वरीत जागेवर लान, खेळणी, बेन्च बसविणार, बॉक्स ठेवणार. ये-जा करणाऱ्या नागरीकांना दिसले पाहिजे. त्या जाहिरातून महापालिकेला उत्पन्न मिळेल. जमिन देणार मेन्टेनन्स करणार नंतर फलक लावणार.

कार्य.अभियंता(विद्युड्रे) : जमिन देत नाही ठेका देत आहोत. जसे एखादे उद्यान विकसीत करतो.

श्री.संजय सिरसाट : ८० लक्षचा प्रोजेक्ट आहे शहरातील संपूर्ण चौक विकसीत करू शकतो एवढी रक्कम आहे. यात कुठेही दिशा दाखवलेली नाही.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) : तीन वर्ष संबधीत एजन्सीकडून फ्रि ऑफ कॉस्ट मेन्टन करून घेणार ७७ टक्केच पेमेन्ट देणार या ठिकाणी ग्रीन बेल्ट केल्यास जागा सुरक्षित राहिल.

श्री.संजय सिरसाट : दोन वर्षापूर्वी ग्रिनबेल्टचे ४९ लक्षचे टेंडर दिले होते त्याचा अहवाल आहे का? प्रशासनाला हा प्रस्ताव योग्य वाटतो का? एक कोटी जातात.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) : सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : प्रस्ताव दिला जागेचा उल्लेख केला नाही.ग्रिनबेल्ट साठी एक कोटी खर्च करणे योग्य वाटत नाही.किती मोकळी जागा आहे ज्यात खेळणी बसणार आहे. सर्वीस रोड अप्रोच रोड त्यास येतात रस्त्याच्या मधल्या जागेवर खेळणी बसविणे योग्य आहे का ?

कार्य.अभियंता(वि.ड्रे.) : दोन्ही बाजूला सर्व्हीस रोड आहे त्या मधल्या जागेत बसविणार आहोत.रस्त्याच्या दोन्ही बाजूला पॅरलल गार्डन प्रमाणे असणार आहे. सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे.

श्री.संजय सिरसाट : जेंव्हा मंजूरी दिली त्याची कल्पना वेगळी होती आजही एरीया दिलेला नाही आज कळाले हा रस्ता आहे त्यावेळी प्रस्तावात रस्त्याचा उल्लेख केला नव्हता. नियमानुसार किती स्क्वेअर फुटापर्यत खेळणी बसविता येते? झोका एकीकडे, घसरगुंडी एकीकडे असा प्रकार करणार काय?महापालिकेचा जनतेचा पैसा जाणार आहे या ठिकाणी खेळणी बसविण्या मागचा उद्येश काय आहे स्पष्ट खुलासा द्यावा.

कार्य.अभियंता(वि.ड्रे.) : खेळणीचे अॅटम कमी आहे. रोड फर्निचरचे अॅटम आहे. सर्वच खेळणी नाही.

श्री.अ.रशीद खान : सर्वसाधारण सभेचे किती रक्कमेला मंजूरी दिली होती. ७४ लक्षला मंजूरी दिली असेल टेंडर २१% जास्त दराने आले जास्तीची रक्कम कोणत्या हेड मधून देणार आहे.

कार्य.अभियंता : ७४ लक्षला मंजूरी दिली होती.जास्तीची रक्कम महापालिका फंडातून खर्च केली जाईल तीन वर्षात पेमेन्ट द्यायचे आहे. जास्तीच्या खर्चाच्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केला जाईल.

श्री.अ.रशिद खान : अधिकारी व संबधीत काम करणारी एजन्सी दोन्ही मिळून हे टेंडर मंजूरीसाठी आलेले आहे. माती, झाडांसाठी एवढी रक्कम खर्च करणे योग्य नसून बिलो ऐवजी २१ टक्के जास्त दराने टेंडर येते हे बरोबर नाही.

कार्य.अभियंता(वि.ड्रे.) : यात अॅटम जास्त असल्याने खर्चही जास्त होणार आहे.

श्री.संजय सिरसाट : अॅटम कोणकोणते आहे खुलासा करावा तसेच मातीचे अॅटम कोणते. ग्रिन लॉन किती स्क्वेअर फुट लावणार खेळणी किती कॉन्टीटी मध्ये घेणार तोही खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान मामू : मातीचे अॅटम कोणते आहेत.

उपअभियंता(बांध.) : यात खोदकाम ३५४ क्यू.मी., मुरूम टाकणे ते पण ३५४ क्यु.मी. पीसीसी कॉन्क्रीट ११२ क्यू.मी., खर्च रू १.३३ लक्ष, डब्बर कामाचे प्लीन्थवर चेनलिंक अॅगल ९७२ क्यू.मी. असून खर्च १०.०१ लक्ष,वन-टू-फोर टाकले जाते ते १०८ क्यू.मी. असून खर्च २.०८ लक्ष.वन टू फोरचा एक अॅटम ८६००रू खर्चाचा आहे. गेटसाठी ८ क्यू.मी. बांधावे लागते त्यास २४ हजार खर्च लॉनसाठी ८०००क्यू.मी. पुर्ण लांबीमध्ये अॅटम आहे त्यासाठी खर्च ९.९६ लक्ष.

श्री.अ.रशिद खान मामू : आतापर्यत ज्या ज्या ठिकाणी केले ते चांगले आहेत का?

उपअभियंता (बांध.) : आरआरसी टॉयलेट बांधकामसाठी ३२ हजार आणखी एक आरसीसी टॉयलेट साठी ३.४७ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. कॉन्क्रीट बॉक्स पेव्हींग व इतर साठी ८ लक्ष खर्च येणार आहे.

श्री.संजय सिरसाट : यात दोन तीन ठिकाणी खोदकाम दाखवले आहे. नंतर नऊ लक्षची माती आणणार पीव्हींग ब्लॉक बसविणार जे ग्रिनरी करणार लॉन किती रक्कमेचे आहे.

कार्य.अभियंता : ९ लक्ष खर्च येणार आहे.

श्री.संजय सिरसाट :एवढा खर्च करणार झाडाच्या खाली गवत येतो पहिल्यांदा ऐकतो ग्रिनबेल्टमध्ये आजही हजारो झाडे उभी आहेत नेमके काय करणा ार आहे स्पष्ट उत्तर दयावे. पेव्हीग ब्लॉक बसविणे, चेनलिंक लावणे, साईडला बांधकाम करणार, बाजुला

टॉयलेट चे काम करणार यास ग्रिनबेल्ट म्हणू शकतो का? खेळणी कितीची आहे. ८० लक्ष खर्च करणार सर्वसामान्य नागरीकांचा हा पैसा आहे. व्यर्थ जावू नये.

कार्य.अभियंता - विद्यु. :सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती.सिडको हस्तांतरणाच्या वेळेस १५ कोटी मधील हे काम आहे. सर्वसाधारण सभेच्या इच्छेनुसार सादर केलेला आहे. मंजूर करायचे की नाही हा सभागृहाचा निर्णय आहे. यातील २५ लक्ष उद्यान विभागाकडे झाडे लावण्यासाठी दिलेले आहे.

श्री.संजय सिरसाट :ग्रिन बेल्ट विकसीत करणे याची व्याख्या काय आहे.

कार्य.अभियंता(विड्रेइ): लॉन लावणार एकदम सुंदर दिसणार असून सावलीत लॉन येते.

श्रीमती जयश्रीकिवळेकर : सिडको हस्तांतरण केले त्यापोटी १५ कोटी व शासनाने २५ कोटी असे एकूण ४० कोटी विकास कामासाठी आले. यापूर्वी सिडको भागात ४९ लक्ष खर्च करून ग्रिनबेल्ट कुठे केलेला आहे त्याची परीस्थिती काय आहे दोन वर्षापासून ग्रिनबेल्टची स्थिती बेकार आहे. पुर्वी झालेल्या ग्रिनबेल्ट विषयी माहिती द्यावी. हाच खर्च सिडकोतील नागरीकांना पाणी देण्यासाठी केला असता तर योग्य ठरले असते. पुर्वीपेक्षा सिडको ग्रीन बेल्टची परिस्थिती बेकार आहे. यापुर्वी २ प्रस्ताव आले त्याचे काय झाले. ५० लाखाचे प्रस्ताव पारित झाले त्याची काय स्थिती आहे. ग्रीनबेल्ट विकसीत उव्हावे. दुमत नाही. लॉन आहे का? पाण्यासाठी जनतेच्या जिवाचा खेळ होतो. जेथे पाणी नाही, ५० लाखाचा हिशोब द्यावा. दैनंदिन सेवा देण्याची कल्पना करावी. जनतेसाठी काम दिले. अधिकारी त्या भागात राहतात. पाण्याची आजच का ओरड होते.

श्री.जावेद कुरेशी : दिवसाआड शहराला पाणी पुरवठा करतात. तर झाडाला काय पाणी देणार.

कार्य.अभियंता -(विद्यु.ड्रे): ६ मी. म्हणजे २० फुट रूंद असणार आहे.ग्रीनबेल्ट केल्यास चांगले दिसेल मंजूरी दयावी.

श्री.संजय सिरसाट :२० फुट मध्ये अरिहंत कंपनीच्या खेळण्या बसविणार होर्डींग बोर्ड लावणार आहात असे चालते का?

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) :यात चार ते पाच प्रकारच्या खेळणी असणार आहे.मान्यता दयावी.

श्रीमती जयश्री किवळेकर: जनतेचा खेळ करीत आहात. ग्रीनबेल्टमध्ये खेळणी लावत नाही.जनतेला ज्या अत्यावश्यक सोयी सुविधा दयायला पाहिजे त्या दयाव्यात याची गरज नाही पूर्वीचे ग्रीनबेल्टची परीस्थिती कशी आहे खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) : रू. १.८० लक्षची खेळणी असणार आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर: वार्डात एक दिवसा आड पाणी येवूनही अर्धा तास पाणी नसते प्रेशर नसते असे असतांना त्यासाठी खर्च न करता यावर खर्च करण्याची आताच का गरज भासत आहे.पाण्यासाठी २ कोटी दयावे यास आमचा विरोध पाणी नागरीकांना अत्यावश्यक सुविधा अगोदर दयाव्यात.

श्री.मोहन मेघावाले :यापूर्वी केलेल्या ग्रिनबेल्ट मधील झाडे पाण्या अभावी सुकतात याकडे प्रशासनाचे लक्ष नाही

श्री.अ.रशिद खान :पिण्यासाठी पाणी नाही झाडे लावल्यानंतर कोठून पाणी देणार.

श्रीमती जयश्री किवळेकर:सिडकोचे आलेले १५ कोटी यातून दोन वर्षात कोणती कामे केली तसेच लाईट , स्वच्छता व पाणी ही पुर्ण व्यवस्था ढेपाळलेली आहे. ५० लक्ष यापूर्वी अशाच कामावर कशासाठी खर्च केले खुलसा दयावा सर्व सदस्य तेथे जावून पाहणी करू

श्री.अ.रशिद खान :यात स्पर्धा झालेली नाही एक निविदा आहे. रिकॉल करावे.

श्री.संजय सिरसाट :सिडकोच्या स. सदस्यांच्या वार्डातील एखादा चांगल ग्रिनबेल्ट डेव्हलप करावा हा खर्च त्या ठिकाणी करावा हा प्रस्ताव रद्य करावा.

श्री.मोहन मेघावाले :पाण्याचा प्रश्न अगोदर सोडवावा नंतर हा खर्च करावा. सिडको हडको भागात दोन वर्षात कुठे किती कामे केली याचा आढावा दयावा.

श्रीमती जयश्री किवळेकरः सिडकोत स्व.वसंतराव नाईक यांचा पुतळा अतिक्रमणाने वेढलेला दिसतो तो ग्रीनबेल्टमध्ये असल्याचे वाटतच नाही. यास आमचा विरोध नाही अगोदरचे ग्रिनबेल्टवर ५० लक्ष कुठे व कशासाठी खर्च केले त्याचा तपशील द्यावा.

श्री.संजय सिरसाट :ग्रिनबेल्ट कुठे आहे किती आहे एरिया किती आहे रस्त्या बाजूला खेळणी लावण्याची पध्दत ही कशाच्या अधारे सुरू करीत आहोत. सविस्तर माहिती द्यावी.

कार्य.अभियंता(विद्य.ड्रे.):सिडको हस्तांतर त्यापोटी महापालिकेला १५ कोटी मिळाले त्या अंतर्गत हा विषय ठेवलेला आहे. प्रेसीडेंन्ट पार्क ते भक्ती गणेश मंरीराच्या काही पूढे पर्यत दुतर्फा ग्रीनबेल्ट सुटलेला आहे पुर्वी त्या ठिकाणी तारफिसींग केली होती ती सध्या तुटलेली असून सिडकोच्या काळातील जो ग्रिन्बेल्ट हाता तो पूर्णतः उध्वस्त झालेला आहे.

श्री.संजय सिरसाट :तारंफिन्सींग तुटली मान्य आहे परंतू कुठे ही झाडे नाही असे प्रशासनाचे म्हणणे असेल तर चुकीचे आहे.झाडे असेल तेथे खेळणी बसविणार काय?

कार्य.अभियंता(विद्य.ड्रे.): खेळणी हा वन ऑफ द अॅटम आहे. सर्वच ठिकाणी खेळणी बसविणार नाही.

श्री.संजय सिरसाट :एकूण किती ग्रीनबेल्ट विकसीत करणार त्यांचा उल्लेखच दिला नाही.

कार्य.अभियंता (विद्य.ड्रे.):ग्रीनबेल्ट हा दोन्ही बाजूने ५००-५०० मीटर आहे सहा मीटर विल्र्थ असून जे की ३०००-३००० हजार मीटर एक एक बाजूने राहील.एकूण ६०-७० हजार स्क्वेअरफुट होईल.दोन्ही बाजूने फेन्सींग करणार जाहिरात लावण्यासाठी बॉक्स सोडलेले असून जाहिरातून जे उत्पन्न येईल ते महापालिकेला मिळेल. स्टीट फर्निचर बसविणार तीन वर्ष संबधीताने मेंन्टर करणार आहे.

श्री.संजय सिरसाट :अंदाजे लेन्थ काढलेली आहे. प्रेसीडेंन्ट पार्क ते वखार्ड पर्यत रस्ता घेतला म्हणजे सिडकोचा सर्व भाग येतो असे नाही.प्रस्ताव तयार करीत असतांना पुर्ण लेन्थ असेल प्रस्तावात दिले नाही.जी झाडे असतील ती तोडणार नाही उर्वरीत जागेवर लॉंग , खेळणी, बॅन्च बसविणार बॉक्स ठेवणार जे की ये- जा करणा-या नागरीकांना दिसेल त्या जाहिरातून महापालिकेला उत्पन्न मिळेल. जमिन देणार मेन्टन्स करणार नंतर फलक लावणार.

कार्य.अभियंता -(विद्युड्रे) :जमिन देत नाही ठेका देत आहोत. जसे एखादे उदयान विकसीत करतो

श्री.संजय सिरसाट :८० लक्षचा प्रोजेक्ट आहे शहरातील संपूर्ण चौक विकसीत करू शकतो एवढी रक्कम आहे. यात कुठेही दिशा दाखवलेली नाही.

कार्य.अभियंता (विद्यु.ड्रे): तीन वर्ष संबधीत एजन्सीकडून फ्रि ऑप कॉस्ट मेन्टन करून घेणार ७७ टक्केच पेमेन्ट देणार या ठिकाणी ग्रीन बेल्ट केल्यास जागा सुरक्षित राहिल.

श्री.संजय सिरसाट : दोन वर्षापूर्वी ग्रिनबेल्टचे ४९ लक्षचे टेंडर दिले होते त्याचा अहवाल आहे का? प्रशासनाला हा प्रस्ताव योग्य वाटतो का?

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) :सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अमलबजावणी केलेली आहे.

श्री.संजय सिरसाट :प्रस्ताव दिला जागेचा उल्लेख केला नाही.ग्रिनबेल्ट साठी एक कोटी खर्च करणे योग्य वाटत नाही.किती मोकळी जागा आहे ज्यात रिगलची खेळणी बसणार आहे. सर्वीस रोड अप्रोज रोड त्यास येतात रस्त्याच्या मधल्या जागेवर खेळणी बसविणे योग्य आहे का ?

कार्य.अभियंता(विद्य.ड्रे.) :दोन्ही बाजूला सर्वीस रोड आहे त्या मधल्या जागेत बसविणार आहोत.रस्त्याच्या दोन्ही बाजूला पॅरलल गार्डन प्रमाणे असणार आहे.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे.

श्री.संजय सिरसाट :जेंव्हा मंजूरी दिली त्याची कल्पना वेगळी होती आजही एरीया दिलेला नाही आज कळाले हा रस्ता आहे त्यावेळी प्रस्तावात रस्त्याचा उल्लेख केला नव्हता. नियमानुसार किती स्क्वेअर फुटापर्यत खेळणी बसविता येते झुला एकीकडे

घसरगुंडी एकीकडे असा प्रकार करणार काय?महापालिकेचा जनतेचा पैसा जाणार आहे या ठिकाणी खेळणी बसविण्या मागचा उद्येश काय आहे स्पष्ट खुलासा दयावा.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे.) :खेळणीचे ॲटम कमी आहे फनीचरचे ॲटम आहे. सर्वच खेळणी नाही.

श्री.अ.रशीद खान :सर्वसाधारण सभेचे किती रक्कमेला मंजूरी दिली होती.७४ लक्षला मंजूरी दिली असेल टेंडर २१ टक्के जास्त दराने आले जास्तीची रक्कम कोणत्या हेड मधून देणार आहे.

कार्य.अभियंता : ७४ लक्षला मंजूरी दिली होती.जास्तीची रक्कम महापालिका फंडातून खर्च केली जाईल तीन वर्षात पेमेन्ट दयायचे आहे.जास्तीच्या खर्चाच्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केला जाईल.

श्री.अ.रशिद खान :अधिकारी व संबधीत काम करणारी एजन्सी दोन्ही मिळून हे टेंडर मंजूरीसाठी आलेले आहे. माती झाडे साठी एवढी रक्कम खर्च करणे योग्य नसून बिलो ऐवजी २१ टक्के जास्त दराने टेंडर येते हे बरोबर नाही.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे.) :यात ॲटम जास्त असल्याने खर्चही जास्त होणार आहे.

श्री.संजय सिरसाट : ॲटम कोणकोणते आहे खुलासा करावा तसेच मातीचे ॲटम कोणते.ग्रिनलॉन किती स्क्वेअर फुट लावणार खेळणी किती कॉन्टेटी मध्ये घेणार तोही खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान मामू : मातीचे ॲटम कोणते आहेत.

श्री.संजय सिरसाट : यापूर्वी केलेल्या ग्रिनबेल्टच्या संदर्भात चौकशी करावी. हा ठराव रद्य करावा.

श्री.मो.जावेद मो.इसाक : सर्वसाधारण सभेत घाई गरबडीत हा प्रस्ताव मंजूर झाला असावा. झाडे व लॉन लावण्यासाठी १ कोटी खर्च करणे योग्य नाही पिण्याच्या पाण्याचा अगोदर प्रश्न सोडवावा हा ठराव रद्य करावा नागरीकांच्या पैशाचा गैरवापर होवू नये.

श्रीमती जयश्री किवळेकर : ५० लक्ष यापूर्वी अशाच कामावर खर्च कशासाठी केले होते खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे) : याची माहिती घेवून देण्यात येईल.

श्री.अ.रशिद खान मामु : झाडे लावण्यासाठी ३३ लक्षची तरतूद ठेवली आहे. त्यातून शहरात झाले लावू शकतो. वृक्ष कराच्या माध्यमातून २ टक्के वसूल करतो

श्री.मोहन मेघावाले : विकासाची कामे थांबून आहे वार्डात ५० लक्षचे काम होत नाही. यासाठी पाणी कोठून देणार आहे. प्रस्ताव रद्य करावा.

श्री.संजय सिरसाट :माती आणणार आहे झाडे खरेदी करणार असा कुठेही उल्लेख नाही. लॉन किती रक्कमेची आणणार आहे याचाही उल्लेख दिसून येत नाही.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे): एक कि. मीटरचे अंतर येणार चारही बाजूने जवळपास फिन्सींग येणार आहे.

श्री.संजय सिरसाट : लॉन लावणार माती ठेकेदार आणणार, झाडे उद्यान विभाग, आपण विभागामार्फत माती टाकू शकत नाही का? लॉनचे ॲटम कितीचे आहे.

कार्य.अभियंता-विद्यु : महापालिकेच्या मार्फत ही माती टाकून घेतात येईल तसा निर्णय घ्यावा. यासाठी पीएमसी नियुक्त केली होती. सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. लॉन ६०-७० हजार स्क्वे. फुट पर्यत लावणार आहोत त्याचे रक्कम डायव्हर्ट केली आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : सभागृहाचा वेळ वाया घालवू नये. पब्लीकचा पैसा आहे. व्यर्थ जावू नये रद्द करावे.

श्री.संजय सिरसाट : सर्वसाधरण सभेची मान्यता झाल्या नंतर जे काही अंेदाजपत्रक तयार होते त्यात ॲटम टाकायला पाहिजे होते खेळणी कितीची नाममात्र दिले म्हणजे अलग अलग जागेवर बसविणार असा अर्थ निघतो. १० लक्षची माती घेणार परंतू एक झाड लावण्याचे सुध्दा यात नमुद नाही हे योग्य वाटत नसून रद्द करावे.

मा.सभापती : जे ॲटम आहेत ते विषयपत्रिकेवर न आल्यामूळे यात स्पर्धा न होता एकच निविदा आल्याने प्रस्ताव रिकॉल करण्यात येवून व्यवस्थीत सभागृहात सादर करावा.

श्री.मो.जावेद मो.इसाक : रिकॉल न करता डायरेक्ट रद्द करावे.

मा.सभापती : स्थायी समितीकडे सर्वसाधारण सभेने पाठविलेला होता.

श्री.मोहन मेघावाले : यापूर्वी ५० लक्ष खर्च करून ग्रिनबेल्ट केला तो खर्च कशासाठी व कुठे केला त्याचा खुलासा घेण्यात यावा. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.संजय सिरसाट : एजन्सीचे टेंडर रद्द करावे मुळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे सविस्तर देण्याची सुचना करावी.

मा.सभापती : ही निविदा रद्द करण्यात येते. मुळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात येते.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : २५ लक्ष झाडे लावण्यासाठी खर्च करणार आहोत जे आहे ते झाडी तोडली जात आहे त्याचे नुकसानभरपाई कोण देणार आहे.

मा.सभापती : जनरल चर्चेत हा विषय घ्यावा.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील निविदा रद्द करून मुळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ४४५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गारखेडा स.नं.५१ व ५२ नाथ प्रांगण येथे कारगील वन उभारणे करीता सा.बां.विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१६,७३,५७४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेने विशेष अटी व शर्तीसहीत दि.२६.१०.२००७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण १ निविदा विक्री झाली व १ निविदा दर भरून प्राप्त झाली.

१. गोसावी एस. के. १७.२१% जास्त दराने

उपरोक्त नुसार गोसावी एस. के. यांची अं.प.दरापेक्षा १७.२१% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली असल्या कारणाने संबंधीत गुत्तेदारास मा.आयुक्त यांच्या दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता अं.प.दरापेक्षा १७.२१% जास्त दराऐवजी १२% जास्त दराने सदरील निविदा स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामा अंतर्गत खालील अटी व शर्तीचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. सदरील उद्यानाचे नियोजित विकास कामे पुर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षाच्या कालावधी करीता उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीसह संबंधीत नियुक्त मक्तेदारांनी/एजसीने करणे आवश्यक राहील. ३ वर्षानंतर सुस्थितीत विनाअट, विना मोबदला सदरील उद्यान महानगरपालिकेस हस्तांतरण करणे बंधनकारक राहील. सदरील ग्रीनबेल्ट अंतर्गत बसविण्यात येणारी खेळणी नामांकित रिगल/अरिहंत कंपनीची आयएसओ प्रमाणित असणे बंधनकारक राहील.
२. सदरील उद्यानाचे काम ज्या मक्तेदारास/एजन्सीला देण्यात येईल त्यांनी सिध्दार्थ उद्यानाच्या धर्तीवर व मंजुर दरानुसार प्रवेश शुल्क, पार्कींग शुल्क लावून त्यातून जमा होणाऱ्या महसुलातून उद्यानाचा देखभाल दुरूस्तीचा खर्च ३ वर्षापर्यंत करावे.
३. सदरील उद्याना करीता नियुक्त मक्तेदार/एजन्सीला काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यानच्या देयकापैकी निव्वळ ७७% देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजित काम पूर्ण झाल्यानंतर संबंधिताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून रोखुन ठेवलेल्या २३% रक्कमेपैकी ५% रक्कम संबंधित देयकाच्या १ वर्षाच्या कालावधीनंतर, ६% रक्कम दोन वर्षाच्या कालावधीनंतर, ७% रक्कम तीन वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत ५% रक्कम सदरील उद्यान सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरण केल्याच्या ९० दिवसानंतर अदा करण्यात येईल.
४. प्रत्येक वर्षी २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, १ मे, ८ डिसेंबर यासारख्या महत्वाच्या दिवशी महानगरपालिकेने काही कार्यक्रम उद्यानात आयोजित केल्यास संबंधीत मक्तेदारास/एजन्सीला त्या कार्ग्रमासाठी उद्यानातील जागा, उद्यान विनामुल्य उपलब्ध करून द्यावे लागेल.

त्यानुसार गोसावी एस. के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.२१% जास्त दराऐवजी १२% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : सदरील प्रसतावास स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ४४ सेंट्रल नाका कब्रस्तान ते रहेमानिया कॉलनी पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.२४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधरण सभा ठराव क्र.०६/०४ दि.२०.११.२००७ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त निविदा बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन | **३.१९% कमी दराने** |
| २. | एकनाथ माणिकराव दहिफळे | **१.५२% कमी दराने** |
| ३. | मे. आर. के. कन्स्ट्रक्शन | **५.९९% जास्त दराने** |

उपरोक्त नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१९% कमी दराची निविदा श्री.काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन यांची आहे. मा. आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे. तरी श्री. काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन यांची ३.१९% कमी दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : सदरील प्रसतावास स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.महापौर कार्यालयाचे नुतनीकरण करणे करीता सा.बां. विभागाचे सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची/बाजार भावातील दरसुची नुसार रक्कम रूपये ९,९९,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च प्रशासकीय इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत सन २००७-०८ या आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ३ निविदा विक्री झाल्या व ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | ड्रिमलॅण्ड कन्स्ट्रक्शन | **१६.३१% कमी दराने** |
| २. | के. एस. कन्स्ट्रक्शन | **६% कमी दराने** |
| ३. | म.सिद्यीकी म. अझहर सिद्यीकी | **१.१७% कमी दराने** |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.३१% कमी दराची निविदा ड्रिमलॅण्ड कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे.

सदरील निविदेस मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली असून काम प्रगतीपथावर आहे. दरम्यान मा.उप महापौर, मा.सभागृह नेता व मा.विरोधी पक्ष नेता यांनी देखील त्यांचे दालनाचे नुतनीकरण करणे बाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार सदरील वाढीव कामास्तव रक्कम रू.५.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून आवश्यक तरतुद रक्कम रू.५.०० लक्ष वळती करणे बाबतच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने दि.२२.१०.२००७ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचे वाढीव अंदाजपत्रक रक्कम रू.९,९९,९०० + ५,००,००० = १४,९९,९००/- व सदरील वाढीव काम कामाचे मुळ गुत्तेदार ड्रिमलॅण्ड कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.महापौर कार्यालयाचे नुतनीकरण करण्याचे कामा दरम्यान मा.उप महापौर, मा.सभागृह नेता व मा.विरोधी पक्ष नेता यांचे दालनाचे नुतनीकरण करण्याचे कामासाठी वाढीव कामास्तव रक्कम रू.५.०० लक्ष चे अंदाजपत्रकास तसेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.९,९९,९०० + ५,००,००० = १४,९९,९००/- व सदरील वाढीव काम कामाचे मुळ गुत्तेदार ड्रिमलॅण्ड कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, आमखास मैदान येथील ३५ मी. विकास योजना अंतर्गत उड्डाणपुल बाधीत होणाऱ्या टी.बी. हॉस्पीटल इमारतीचे बांधकाम करणे या कामाची अंदाजपत्रकी रक्कम रू.१६,९४,४९६/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | हायवे कन्स्ट्रक्शन | **८.५९% कमी दराने** |
| २. | शेख मोहम्मद इब्राहिम | **५.२५% कमी दराने** |
| ३. | एस. ए. देशमुख | **९.३५% जास्त दराने** |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी हायवे कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.५९% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी हायवे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.५९% कमीदराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी :जागा व बांधकामाचे नकाशे हे नगररचना विभागाकडून मंजूर केले का? जागा किती उपलब्ध आहे डीपी रोडवर घर असेल त्या व्यक्तीला मोबदला दिला जातो की घर बांधून दिले जाते ती जागा च अमखास मैदान कुणाच्या मालकीचे आहे.डी.पी प्लॅनमध्ये जागा दिली त्यास मागेपुढे मार्जीन लागते.

अति.शहर अभियंता :अमखास मैदान येथील टी.बी हॉस्पीटलची काही जागा डीपी रस्त्यामध्ये जात आहे. त्यांना मोबदला न देता तेवढयाच रक्कमेचे जेवढे बांधकाम काढले तेवढेच बांधकाम त्यांचेच जागेत करून देत आहोत.ती जागा शासकीय वैद्यकीय महाविदयालयाची आहे.

श्री.वसंत नरवडे :पुलाचे काम रस्ते विकास महामंडळ करीत आहे हा खर्च त्यांचेकडून करता येणार नाही का? महापालिका हद्दीत बांधत आहे त्यात ती बांधीत झालेली जागा असून शासकीय आहे. महापालिका ऐवजी रस्ते विकास महामंडळाने खर्च करावा अशी कल्पना होती जे ठरले त्यात तसे आहेत का?

अति.शहर अभियंता :त्यात तसे दिलेले नाही.

मा.सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथील ३५ मी. विकास योजना अंतर्गत उड्डाणपुल बाधीत होणाऱ्या टी.बी. हॉस्पीटल इमारतीचे बांधकाम करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.५९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा बीओटी तत्वावर विकासकाकडून विकसीत करण्यात आली असून सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत.

शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा तीन वर्षाच्या भाडेतत्वावर भाड्याने देणेसाठी निविदा काढण्यात आली असता, निविदा विक्रीच्या अंतीम दिनांकास एकूण दोन निविदा विक्री झाल्या तसेच दिनांक ११/१/२००८ रोजी ई-टेंडरींग द्वा रे निविदा उघडण्यात आल्या असता, एक निविदा भरून प्राप्त झाली.

प्राप्त झालेली निविदा मे.रागा कम्प्युटर सेंटर यांची असून त्यांची निविदा रूपये ५,९०,०४०/- एवढी रक्कम प्रति वर्ष भाडे दर भरून प्राप्त झाली. दर कमी असल्याने संबंधित निविदाधारक यांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता, वाटाघाटी अंती निविदाधारक यांनी उपरोक्त दरामध्ये रूपये ५०,०००/- ची वाढ करून भाडेपट्ट्या करीता रूपये ६,४०,०००/- प्रति वर्ष एवढे दर मान्य केले आहेत.

शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा तीन वर्षाच्या भाडेतत्वावर देणेचा प्रस्ताव असुन निविदाधारक यांना खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

१. महानगरपालिके सोबत तीन वर्षासाठी भाडेपट्टा करार करावा लागेल.
२. जवळपास १००० डिटॅचेबल प्रिफॅब्रीकेटेड कव्हर्ड गाळे तयार करणे आवश्यक राहील.
३. भाडेपट्ट्याची रक्कम ठरविल्याप्रमाणे दरवर्षी महानगरपालिकेस भाडेपट्ट्याचा भरणा करावा लागेल. ठराविक वेळेवर भाडे न भरल्यास २% प्रतिमहा प्रमाणे व्याज आकारण्यात येईल व ही रक्कम सुरक्षा ठेव रक्कमेतुन कपात करण्यात येईल.
४. प्रत्येक सोमवारी भाजी मार्केटसाठी गाळे भाड्याने द्यावे लागेल व इतर सहा दिवस अनुज्ञेय कामासाठी वापर करावा.
५. भाजी मार्केटसाठीच्या जागेची साफसफाई व देखरेख करणे एजन्सीला बंधनकारक राहील.
६. सर्व प्रकारचे टॅक्स, विज पुरवठा बिल, पाणी पुरवठा बील, मनपाचे कर इत्यादी निविदाधारकास भरणे बंधनकारक राहील.
७. आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे व परवानगी संबंधित खात्याकडून प्राप्त करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.
८. महानगरपालिकेस देणार असलेले भाडे, गाळे तयार करण्यासाठी येणारा खर्च व इतर खर्च एजन्सी गाळे व जागा भाड्याने देवुन वसुल करू शकेल.
९. तीन वर्षानंतर एजन्सीला सदर जागा चांगल्या स्थितीत मनपास परत करावी लागेल.

करीता निविदाधारक मे.रागा कॅम्प्युटर सेंटर यांचे दर रूपये ६,४०,०००/- प्रति वर्ष प्रमाणे भाडे तीन वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीसह मान्य करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : यातील काही प्रस्तावावर खुलासा करण्यासाठी कुणी अधिकारी आहे का? नसेल तर स्थगित ठेवावे.

मा.सभापती : विषय क्र. ४४९ ते४५२ स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४५० :**

प्रस्ताव सादरकरण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या वाढत्या विकासामुळे/शहरवाढीमुळे तसेच भविष्यातील विकासाच्या वाढत्या कक्षांच्या दृष्टीने शहर सक्षम व्हावे, महानगरपालिकेकडून त्यास पुरक व भविष्यातील गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने विकास योजना/प्रकल्प तयार करणे, प्रत्यक्षात राबविणे इत्यादींच्या कार्यवाहीचे दृष्टीने धोरण निश्चित करून औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाढती कामे विचारात घेऊन वॉर्ड कार्यालयाची रचना करण्यात आली. वॉर्डाकडील कामे, मुख्यालयाकडील कामे यानुसार झालेली तांत्रिक कर्मचाऱ्यांची विभागणी, मोठे प्रकल्प स्वरूपाची कामे व देखभाल दुरूस्ती स्वरूपाची कामे असे कामाचे स्वरूप, कामाची तातडी इत्यादीचे प्रमाणात अपेक्षीत तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाहीत. कोणत्याही विकास कामाबाबत प्रस्ताव प्राप्तीनंतर (१) त्यावरील सर्वेक्षण व तत्सम कार्यवाहीसह कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, (२) निविदा कार्यवाही, पाठपुरावा करून प्रत्यक्ष काम सुरू करणे, (३) कामाची देखरेख करणे इत्यादी कामाकरीता आवश्यक असलेला नियमीत पॅटर्न नुसारचा रोड कारकुन, दुय्यम आवेक्षक, कनिष्ठ अभियंता असा पुरेसा कर्मचारी वर्ग प्रत्येक विभागात उपलब्ध नसल्याने अपेक्षीत कार्यवाही करणे कर्मचाऱ्यांअभावी शक्य होत नाही. यासोबतच वॉर्ड कार्यालयामध्ये वर नमूद नियमीत तांत्रिक कामाशिवाय पाणीपट्टी वसूली, दैनंदिन ड्रेनेज सफाई इत्यादी कामामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून ह्या कामासह वर नमुद विकास कामे अपेक्षीत गुणवत्ता राखुन, परिणाम साधुन करून घेणे अडचणीचे होते. बऱ्याच कामी कालमर्यादा राखली जात नाही. पर्यायाने स.सदस्य, नागरिकांच्या तक्रारी/पाठपुरावा वाढतो व विकास कामे पुर्ण करण्यास विलंब होतो.

तुलनात्मक विचार करता साधारणत: प्रयेक वॉर्ड कार्यालयाकडे जवळपास रूपये ७.०० ते ८.०० कोटीची कामे आहेत व महानगरपालिकेचे एकत्रित अर्थसंकल्पापैकी मुख्यालयातील विभागांकडे साधारणत: रूपये १४५.०० कोटी विकास कामाकरीता उपलब्ध होतात. अशा प्रकारे अर्थसंकल्पातील तरतूद रूपये २०३.०० कोटी विकास कामाकरीता प्रस्तावीत आहे. एवढ्या मोठ्या रक्कमेच्या कामाचे व्यवस्थीत नियोजन करणे योग्य त्या पध्दतीने कालमर्यादा राखुन कार्यवाही करून अपेक्षीत परिणाम साधणे, नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देणे ही बाब मुख्य व महत्वपुर्ण बाब आहे.

मात्र उक्त परिस्थिती/मुद्दे विचारात घेता अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग पाहता सदर परिस्थितीचे निराकरण करून अपेक्षीत गुणवत्ता/परिणाम साधुन, अपेक्षीत कालमर्यादा राखुन कामे करणे शक्य होत नसल्याने नागरिकांचा, स.सदस्यांचा रोष व नाराजी वाढते.

विकास कामे/योजना सह नियमीत देखभाल दुरूस्तीची कामे यासाठी साधारणतः दरवर्षी रक्कम रूपये १००-१५० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद असते. सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा अशा प्रकारची तांत्रिक कामे करणाऱ्या विभागात साधारणतः रूपेय ९ ते १० कोटीचे कामांकरीता एक स्वतंत्र विभाग, ज्यामध्ये एक कार्यकारी अभियंता, चार उप अभियंता, वीस कनिष्ठ अभियंता, वीस दुय्यम आवेक्षक व कामाचे आवश्यकतेनुसार रोड कारकुन/सहाय्यक असतात. या संबंधाने विचार केल्यास महानगरपालिकेकडील कामे लहान-लहान स्वरूपाची व बहुतांश देखभाल/दुरूस्ती स्वरूपाची कामे असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीचे कामे पूर्ण करण्यास किमान ५-६ कार्यकारी अभियंता विभाग असणे गरजेचे आहे व त्याप्रमाणात तांत्रिक कर्मचारी ही उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र शासन निर्देश (उदा.शासन धोरणानुसार औरंगाबाद महानगरपालिका सध्या **ड** वर्गात असल्याने) व इतर तांत्रिक व प्रशासकीय बाबी पाहता नव्याने कर्मचारी/पदे निर्माण होत नाही व कर्मचारी भरता येत नाही. पुरेशा तांत्रिक व सुपरवायझरी कर्मचाऱ्यांचे अभावामुळे होणारी कामे अपेक्षीत प्रभावीपणे व सक्षमतेने करता येत नाहीत. त्यामुळे बऱ्याच वेळा कामाची गुणवत्ता, परिमाण/कामास होणारा विलंब, त्यामुळे निर्माण होणारे इतर प्रश्न इत्यादी बाबत तक्रारी प्राप्त होतात व त्या निवारणार्थ ही बराच कार्यालयीन कालापव्यय होतो. परिणामतः पुन्हा उक्त विकास कामाकरीता पुरेसा वेळ देणे उपलब्ध तांत्रिक कर्मचारी वर्गास शक्य होत नाही व पुनः तक्रारी प्राप्त होतात व हे चक्र सुरूच राहते.

वरील परस्थिती दुर करून अपेक्षीत कालमर्यादेत योग्य तो परिणाम साधुन कामे करण्यासाठी असे प्रस्तावित करण्यात येते की, महानगरपालिका मधील कार्य विभागणी/वॉर्ड रचनेनुसार सहा प्रभाग अभियंता, कार्यालयाकरीता प्रत्येकी एक व तीन कार्यकारी अभियंता विभागाकरीता प्रत्येकी एक व कामाच्या स्वरूपानुसार विद्युत विभागासाठी एक याप्रमाणे दहा तांत्रिक एजन्सीची नियुक्ती करण्यात यावी. यासाठीनियुक्त करण्यात येणाऱ्या तांत्रिक एजन्सीकडे उच्चशिक्षित अनुभवी तांत्रिक कर्मचारी वर्ग ज्यात किमान एक व्यक्ती एम.ई.(स्थापत्य/विद्युत अभियांत्रिकी), किमान चार बी.ई.(स्थापत्य/विद्युत अभियांत्रिकी) व प्रत्यक्ष कामाची देखरेख करण्यासाठी आठ डी.सी.ई. (स्थापत्य/विद्युत अभियांत्रिकी पदवीकाधारक) आणे आवश्यक आहे. संबंधीतांनी यापुर्वी केलेल्या कामांचा अनुभव सादर करणे व त्यांचेकडे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता दर्शविणारी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. अशा तांत्रिक दृष्ट्या सक्षम एजन्सीचे माध्यमातुन अर्थसंकल्पातील कामाचे प्रस्तावा संबंधाने प्राथमिक पाहणी, कामाची आवश्यकता पडताळून कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा कार्यवाहीनंतर (१) प्रत्येक काम कंत्राटदाराकडून निविदा अटी/शर्ती/स्पेसीफिकेशन नुसार विहीत मुदतीत काम करून घेणे, (२) त्यावर देखरेख करणे, (३) काम पूर्ण झाल्यानंतर मोजमाप घेऊन देयक तयार करणे, (४)झालेले काम प्रमाणीत करणे इत्यादी कामे करून घेण्यात येतील. ही कामे करून घेण्यासाठी मेहनताना म्हणुन संबंधीतानी केलेल्या प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% रक्कम संबंधीत एजन्सीस देण्यात येईल.

यामुळे कामे अधिक चांगल्या व प्रभावी पध्दतीने करणे शक्य होईल व स.सदस्य व नागरिकांची अपेक्षापूर्ती करणे शक्य होईल तसेच शहर विकासामध्ये मोलाची भर घालणे व भविष्यास सक्षमपणे सामोरे जाणे महानगरपालिकेस शक्य होईल. ज्यामुळे महानगरपालिकेस वाढत्या नागरीकरण, लोसंख्येस पुरेशा सुविधा पुरविणे, विकासाच्या नवीन कक्षा/योजना आत्मसात करणे शक्य होईल.

या कार्यवाहीत महानगरपालिकेस नव्याने कर्मचारी भरणा करणे/पद निर्मिती करणे नसल्याने महानगरपालिका आस्थापना खर्च वाढणार नाही. एजन्सी नियुक्तीमुळे तांत्रिक साह्य उपलब्ध होईलव हा खर्च त्या-त्या कामावर त्यांचे अंदाजपत्रक खर्च/प्रत्यक्ष खर्चा आधारे टाकण्यात येईल. हा खर्च कामाचे खर्चाच्या तुलनेत १.५% ते २% एवढा खर्च अपेक्षीत असल्याने ही रक्कम कामाचा अपेक्षीत परिणाम साधणे व नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासह समाधान होणेच्या तुलनेत अत्यल्प आहे. शहर विकास व भविष्यातील वाढत्या गरजांची पुर्तता करण्यास यामुळे मोलाची भर टाकणे शक्य होईल.

करीता वर सविस्तरपणे नमूद केल्यानुसार वॉर्ड कार्यालय **अ** ते **फ** यासाठी प्रत्येकी एक व तीन कार्यकारी अभियंता विभागांकरीता प्रत्येकी एक व विद्युत विभागाकरीता एक याप्रमाणे एकुण दहा तांत्रिक एजन्सीची नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव असून, सदर प्रस्तावाचा सारासार विचार होऊन योग्य तो निर्णय व्हावा. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४५१ :**

आयुक्त प्रस्ताव सादर करत आहे की, औरंगाबाद हे एक महत्वाचे औद्योगीक व ऐतिहासीक शहर असल्यामुळे व वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे व त्यामुळे अपघात, इतर गंभीर आजारांचे प्रमाण दिवसेदिवस वाढत असल्यामुळे, भुकंप, साथीच्या आजारांचा उद्रेक यासारखी आपतकालीन परिस्थिती कित्येक वेळा उद्‌भवत असते, रुग्ण अत्यवस्थ झाल्यास सुरवातीच्या १ तास त्याला योग्य ते उपचार देण्यास महत्वाचा ठरतो, यासाठी Emergency Medical Service Center सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे यात १. या आपातकालीन वैद्यकीय सेवेमध्ये महानगरपालिका मुख्य समन्वयक म्हणुन काम करेल. महानगरपालिकामध्ये आपातकालीन वैद्यकीय सेवा कॉन्सीलची स्थापना करण्यात आलेली आहे. या सेवेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व इतर खाजगी रुग्णालय ज्यांच्याकडे इ.एम.एस. अँबुलंन्स आहे ते प्रथम भागीदार असतील,आत्तापर्यंत कमलनयन बजाज रुग्णाल,हेडगेवार रुग्णालय, धुत हॉस्पीटल, अॅपेक्स रुग्णालय, एम.जी.एम. रुग्णालय हे प्रथम भागीदार झालेले आहेत.

२. महानगरपालिका व इतर भागीदार रुग्णालयामध्ये करार करण्यात येईल (एम.ओ.यू.) व त्यामधील अटी व शर्तीचा भंग झाल्यास इ.एम.एस. कॉन्सील तर्फे त्या भागीदाराचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

३. इ.एम.एस. रुग्णवाहीकेसाठी व इतर रुग्णवाहीकेसाठी इ.एम.एस. कॉन्सील ठरवेल तेवढे शुल्क प्रति कॉल आकारण्यात येईल व ते त्या संबधीत भागीदार रुग्णालयात आकारले जाईल. शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय येथे रुग्णाने पसंती दिल्यास व तो दारिद्रय रेषेखाली असल्यास मनपातर्फे इ.एम.एस. कॉन्सील ठरवेल त्याप्रमाणे शुल्कात सुट देण्यात येईल.

४. या कॉल सेंटरचा एक विशिष्ट नंबर असेल.तो टोल फ्री असेल ज्या रुग्णालयांना इ.एम.एस. कॉन्सीलने मान्यता दिलेली आहे अशा रुग्णालयाशी हा नंबर वायरलेस यंत्रणेने संलग्नीत असेल. या विशिष्ट नंबरवर नागरीकांनी फोन केल्यास त्यांना ताबोडतोब ही सेवा दिली जाईल.

५. **ई.एम.एस. सिस्टीम मध्ये महानगरपालिकेची जबाबदारी** -अ) या कॉल सेंटरसाठी जी.पी.आर.एस. सेवा मनपातर्फे उपलब्ध करुन दिली जाईल. ब) टेलीकॉमचा खर्च मनपातर्फे केला जाईल (यात टोल फ्री नंबरची कॉस्ट, ग्रुप मोबाईलची कॉस्ट व बिल्स)

६. **ई.एम.एस. सिस्टीम मध्ये एजंन्सीची जबाबदारी -** जागा,फर्निचर, ईलेक्टक्टीक बील , २ टेलीफोन लाईन, सेंटल सर्व्हेर, २ रिंग कॉल पीकअप , इक्वीपमेंटची देखभाल व दुरुस्ती, १ मॅनेजर, राउंड द क्लॉक ज्यात ३ कर्मचाऱ्यांपैकी कमीत कमी १ डॉक्टर असेल ही जबाबदारी अेजंन्सीची असेल, या सिस्टीममध्ये काम करणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनाची जबाबदारी अेजंन्सीची राहील, संगणक,लॅपटॉप पॉवर बॅकअप,जनरेटर,युपीएस, अे.सी. तसेच EMS कॉल सेंटरचे संगणकासाठी लागणारे सॉफटवेअर अेजंन्सीचे असेल. हे कॉल सेंटर २४ तास कार्यरत असेल.

या बाबीचा ठराव दि.२६.१०.२००७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर झालेला आहे. त्याअनुषंगाने ई.एम.एस. कॉल सेंटर ची निवीदा Times of India (Mumbai), Maharashtra Times (Pune), Dainik Lokmat (Aurangabad) Navbharat (Mumbai) या वर्तमानपत्रात दि, १३.०२.२००८ रोजी जाहीरात प्रसिध्द करुन Expression of Interest मागविण्यात आले होते. मुदतीअंती ४ Proposals प्राप्त झाले ते खालील प्रमाणे.

| Sr.No | Particulars | r.Sunil B.Dhule (Rate Per Year) | Dr.Pradeep Benzerge (Rate Per Year) | Infocom Service Pvt.Ltd. (Rate Per Year) | Chatrapati Shivaji Diksha Prasarak Mandal (Rate Per Year) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | If System is install from concern party ( Inclusive all Facility) | Rs.१४,४०,०००/- +Rs.५,००,०००/- (System Installation Charges) = **Rs.१९,४०,०००/-** | Rs.१९,००,०००/- + Rs.६,००,०००/- (System Installation Charges) = **Rs.२५,००,०००/-** | Rs.१४,४०,०००/- (System installation in House) = **Rs.१४,४०,०००/-** | Not Quoted |

वरील प्राप्त झालेल्या Proposals मध्ये Infocom Service Pvt.Ltd. हे सदरील सर्व्हिस हि त्यांच्या जागेत एम.आय.डी.सी. एरीया चीकलठाणा येथे Install करणार असून त्यांचे दर सर्वात कमी आहे व त्यांच्या या कामाचा अनुभव बघता त्यांच्या दरास मान्यता देऊन १ वर्षाचे कार्यादेश देण्यास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४५२ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करत आहे की, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन २००५-०६ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेमधून वॉर्ड (ड) ची निवड होऊन रक्कम रू.५.००

लक्ष चे प्रथम पारितोषिक वॉर्ड ड कार्यालयास प्रदान करण्यात आले आहे. धनादेश क्र.८५०१६३ दि.१९/५/२००७ नुसार रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात आलेली आहे. जमा रक्कमेच्या विनियोगाबाबतचे शासन निर्देश मार्गदर्शक सुचनानुसार खालीलप्रमाणे सदर रक्कम खर्च करणे बाबतचा प्रस्तावीत नियोजन/विनियोगास मा.आयुक्तांची प्रशासकीय मान्यता दि.१/११/२००७ रोजी झाली असून या मध्ये शासन निर्देश मार्गदर्शक सुचनानुसार बक्षिसाच्या रक्कमेचा विनियोग बक्षिस मिळालेल्या क्षेत्रासाठी करणे आवश्यक असून या रक्कमेच्या विनियोगा बाबत मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे खर्च/विनियोग करण्याचे कार्यवाहीस मा.स्थायी समितीची मान्यता व्हावी म्हणून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | बक्षीस रक्कमेच्या ५% रक्कम रू.२५,०००/- | अभियान प्रचारासाठी |
| २ | बक्षीस रक्कमेच्या ५% रक्कम रू.२५,०००/- | प्रशासन व कार्यालयीन खर्च |
| ३ | बक्षीस रक्कमेच्या १५% रक्कम रू.७५,०००/- | वैयक्तिक लाभ यामध्ये महिला, युवक, विद्यार्थी व नागरी स्वच्छता योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या नागरीकांना देता येईल. |
| ४ | बक्षीस रक्कमेच्या ५०% रक्कम रू.२,५०,०००/- | संबंधीत क्षेत्रातील महिला, मुले यांचेसाठी व विशेषतः झोपडपट्टी भागात सार्वजनिक शौचालय बांधकाम/दुरूस्ती देखभाल करीता खर्च करता येईल. |
| ५ | व उर्वरीतरक्कम रू.१,२५,०००/- | सार्वजनिक कामाकरीता ज्यामध्ये पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशक खरेदी, ड्रेनेज, कचराकुंड्या, वृक्षारोपण इ. करीता खर्च करण्यात येईल. |

यानुसार रक्कम रू.२,५०,०००/- करीता प्रभाग ड मधील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती, देखभाल/नवीन बांधकाम इ.साठी मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रक सादर करून काम करण्यात येईल.

वरील १, २, ३ करीताचा एकत्रित खर्च रक्कम रू.१,२५,०००/- व ४ करीताचा खर्च रक्कम रू.२,५०,०००/- असा एकूण रू.३,७५,०००/- खर्च वजा जमा उर्वरीत रक्कम रू.१,२५,०००/- मध्ये पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशके खरेदी, ड्रेनेज, कचराकुंड्या, वृक्षारोपण इ. कामेकरण्यात येतील.

तरी उक्त खर्च विनियोगास मा.स्थायी समितीचा निर्णय होऊन मान्यता होणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करणे योग्य वाटते. मान्यतेनंतरच्या पुढील कार्यवाही करीता प्रस्तावित करण्यात येते की, उक्त विनियोग नियोजन/रक्कम अलॉटमेंट नंतर त्या रक्कमेच्या मर्यादेत निर्णय घेवून प्रत्यक्ष कार्यवाही करण्याबाबत त्यातील विविध कामाकरीता रक्कम विभाजन करणे, त्या रक्कमेच्या खर्चास प्रत्यक्ष मंजुरी व रक्कम खर्च करण्याची कार्यवाही इ. संबंधाने पुढील सर्व कार्यवाही बाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.सभापती, प्रभाग समिती (ड) यांना देण्यात यावे. जेणे करून उक्त प्रस्तावानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीवर विनियोग करणे सोईचे होईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४५३ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री सदगुरू हौसिंग सोसायटी व पॅराडाईज हौसिंग सोसायटी, चिकलठाणा या ठिकाणी १००, १५०, २०० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्यासाठी कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१२,२२,६३७/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००६-०७ नुसार तयार करण्यात आलेले असुन या कामासाठी होणारा खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. सया कामासाठी मा.आयुक्त यांची शिफारस झालेली आहे.

तरी श्री. सदगुरू हौसिंग सोसायटी व पॅराडाईज हौसिंग सोसायटी, चिकलठाणा येथे १००, १५०, २०० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१२,२२,६३७/- चे मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री सदगुरू हौसिंग सोसायटी व पॅराडाईज हौसिंग सोसायटी, चिकलठाणा या ठिकाणी १००, १५०, २०० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्यासाठी कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,२२,६३७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, ई. व उद्याने) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.८८ मधील राजनगर येथील मनपाची प्राथमिक शाळा व आरोग्य केंद्रात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी रक्कम रू.१.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर काम ई-निविदा द्वारे प्राप्त दरानुसार म्हणजेच २५.९९% कमी दराने मे.राघव इ & कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची -ड प्रकरण-५ संविदाचे कलम २(२) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीनुसार करून घेण्यास्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : सदरचे काम तातडीचे असून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास मंजुरी मिळावी.

मा. सभापती : सदरचे काम संबंधीत गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वॉर्ड क्र.८८ मधील राजनगर येथील मनपाची प्राथमिक शाळा व आरोग्य केंद्रात विद्युतीकरणाचे काम मे.राघव इ & कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची-ड प्रकरण-५ संविदाचे कलम २(२) नुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन दलासाठी फोम लिक्वीड ज्यामध्ये AFFF/Protin Foam/Alcohal Resisting Foam खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. राज्यस्तरीय दैनिक वर्तमानपत्रातून जाहीर निविदा देवून उत्पादक कंपनीकडून दर मागविण्यात आले होते. त्यानुसार के.व्ही. फायर केमिकल्स प्रा.लि., मुंबई यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| AFFF Foam | १०००० लिटर्स | रू. ९९/- प्रति लिटर | ९,९०,०००.०० |
| Alcohal Resisting Foam | १००० लिटर्स | रू. २२५/- प्रति लिटर | २,२५,०००.०० |
| Protin Foam | १००० लिटर्स | रू. ७२/- प्रति लिटर | ७२,०००.०० |
| | | एकूण - | १२,८७,०००.०० |
| | | वाटाघाटी अंती ५% कमी | **१२,२२,६५०.००** |

वाटाघाटी अंती के.व्ही. फायर केमिकल्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून रू.१२,२२,६५०/- ची फोम खरेदी करण्यास मा. आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

त्यानुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी फोम लिक्वीड ज्यामध्ये AFFF/Protin Foam/Alcohal Resisting Foam खरेदी करण्यासाठी उत्पादक कंपनीकडून प्राप्त दरानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे के.व्ही. फायर केमिकलस प्रा.लि., मुंबई यांचेकडून र.रू.१२,२२,६५०.०० ची फोम खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| AFFF Foam | १०००० लिटर्स | रू. ९९/- प्रति लिटर | ९,९०,०००.०० |
| Alcohal Resisting Foam | १००० लिटर्स | रू. २२५/- प्रति लिटर | २,२५,०००.०० |
| Protin Foam | १००० लिटर्स | रू. ७२/- प्रति लिटर | ७२,०००.०० |
| | | एकूण - | १२,८७,०००.०० |
| | | वाटाघाटी अंती ५% कमी | **१२,२२,६५०.००** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये १३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समती सभेची मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम स्लम भागात नविन कॉंक्रीट रस्ते मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री सय्यद खुर्शीद हसन | **२२.९९% कमी दराने** |
| २. | श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर | **२१.००% कमी दराने** |
| ३. | श्री.काझी मो.फारूख मो.इस्माईल | **१८.१८% कमी दराने** |
| ४. | मे. अरबाझ कन्स्ट्रक्शन | **१२.०१% कमी दराने** |
| ५. | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | **१२.००% कमी दराने** |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २२.९९% कमी दराची श्री.सय्यद खुर्शीद हसन यांची निविदा प्राप्त आहे. तरी सदरील कामासाठी श्री.सय्यद खुर्शीद हसन यांची अं.प.दरापेक्षा २२.९९% कमी दराची निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २२.९९% कमी दराची श्री.सय्यद खुर्शीद हसन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.६९ व्यंकटेश कॉलनी, स्नेहवर्धिनी कॉलनी, जवाहर कॉलनी, भगवती कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९०,९२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ६ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ६ निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ६ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | ए. एस. कन्ट्रक्शन | **१४.९०% जास्त दराने** |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **१७.११% जास्त दराने** |
| ३. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | **१८.५१% जास्त दराने** |
| ४. | एम. ए. सिद्यीकी | **२०.००% जास्त दराने** |
| ५. | रे कन्स्ट्रक्शन | **२१.२०% जास्त दराने** |
| ६. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | **२५.००% जास्त दराने** |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर अं.प.दरापेक्षा १४.९०% ने जास्त आहे. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.१७,१३,०७३/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १४.९०% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव वाढीव खर्चासह विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६९ व्यंकटेश कॉलनी, स्नेहवर्धिनी कॉलनी, जवाहर कॉलनी, भगवती कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १४.९०% जास्त दराची ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.३५ अंतर्गत गरमपाणी, बारापुल्ला, कोहीनुर कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२७,४८,६१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण ४ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ४

निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | **१६.९९% जास्त दराने** |
| २. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | **१९.९९% जास्त दराने** |
| ३. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **२१.००% जास्त दराने** |
| ४. | के.बी. पाथ्रीकर | **२१.००% जास्त दराने** |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.३१,८३,४३८/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३५ अंतर्गत गरमपाणी, बारापुल्ला, कोहीनुर कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% जास्त दराची आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८९ सहकारनगर उद्यान येथे लोककला दर्शन उद्यान विकसीत करणे (म्युरल बसविणे) बाजारभावातील दरपत्रकानुसार राक्कम रू.४,४६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदर कामाचा खर्च सन २००७-०८ अंतर्गत सर्वसाधारण सभा विषय क्र.९९३ दि.२/८/२००७ अन्वये वळती तरतुदी नुसार करण्यात येईल.

सदरील काम हे विशिष्ट प्रकारचे असल्या कारणाने व तातडीने हाती घ्यावयाचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ संविदा चे नियम २(२) अन्वये भक्ती आर्ट यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८९ सहकारनगर उद्यान येथे लोककला दर्शन उद्यान विकसीत करणे (म्युरल बसविणे) बाजारभावातील दरपत्रकानुसार राक्कम रू.४,४६,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने हाती घ्यावयाचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ संविदा चे नियम २(२) अन्वये भक्ती आर्ट यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बांधकाम विभाग-२ अंतर्गत मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या या कामाकरीता सा.बां. खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१९,९४,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.१९,९४,७००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विभाग-२ अंतर्गत मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांची डांबरीकरणाद्वारे पॅचवर्क/दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या या कामाकरीता सा.बां. खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१९,९५,६३०/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.१९,९५,६३०/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांची डांबरीकरणाद्वारे पॅचवर्क/दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९५,६३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दिल्लीगेट पश्चिमेकडील १८ मीटर रूंद रस्त्यात बाधीत मिळकत न.भू.क्र.७४६६, ७४६९, ७४७०, ७४७१, ७४७३/१ आणि ११४५१ याप्रमाणे एकुण सहा (६) मिळकती बाधीत होत आहेत.

या सहा मिळकती खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेवून त्यांना बदलाबदल म्हणून हिराखान रेखांकन, वेदांतनगर येथे खुले भूखंड देण्यात आले असता हिराखान रेखांकनातील लोकांनी मा.न्यायालयातून या भूखंडाच्या वापरावर तसेच महानगरपालिकेस उक्त भूखंड देण्यास कायम मनाई आदेश (दिनांक ९/१०/२०००) प्राप्त केले आहेत. (आर.सी.एस. क्रमांक ४४५/९१) या सहा मिळकती पैकी तीन भूखंड क्रमांक १, २ व ३ हे पुंडलिक संपतराव मोरे, अमीत विठ्ठल मोरे, कमलाबाई किसनराव सुस्ते यांना अदली बदली प्रमाणे देण्यात आले असता त्यांनी पापालाल जियालाल गोयल यांना विक्री केले असून श्री.पापालाल जियालाल गोयल यांच्या नांवावर पी. आर. कार्ड तयार झाले आहे.

हिराखान रेखांकनातील भूखंड क्रमांक १, २ व ३ चे एकुण क्षेत्र (१०६ + ४७.४ + ४७.२५ = २००.५०) चौ.मी. याप्रमाणे सिध्द शिघ्र गणक २००८ च्या दराप्रमाणे मोबदला १०,६१,६५२/- होत असून ५०% रजिस्ट्री खर्च (३१,८५०/-) वजा जाता १०,३०,७७०/- निव्वळ मोबदला होत असून दिल्लीगेट येथील उक्त सहा बाधीत मिळकती खाजगी वाटाघाटीने संपादना करीता मा.स्थायी समितीने ठराव क्र.३१३ दि.२०/३/२००७ नुसार २१,०८,६३१/- खर्चास मान्यता यापुर्वीच देण्यात आली असून यापैकी तीन मालमत्ता महानगरपालिकेच्या नावे रजिस्ट्री करून दिल्या आहेत. त्याप्रमाणे राहिलेल्या तीन मिळकतीस ७४६६ (रू.१,४४,०००/-), ७४६९ (रू.३,६८,८३२/-) व ११४५१ (रू.१,६१,८००/-) एकुण खर्चास आवश्यक रक्कम रू.६,५५,६३२/- खर्चास वरील प्रमाणे यापुर्वी मान्यता मिळालेली आहे.

करीता हिराखान रेखांकनातील तीन भूखंड दिल्लीगेट येथील भूखंड नगर भूमापन क्रमांक ७४६६, ७४६९ व ११४५१अदला बदला प्रमाणे खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. मोबदला रक्कम रू.१०,३०,७७०/- व ५०% रजिस्ट्री खर्च ३१,८८०/- मंजुरीस्तव व संबंधीतांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट पश्चिमेकडील १८ मी. रूंद रस्त्यात बाधीत मिळकती (न.भु.क्र.७४६६, ७४६९, आणि ११४५१) हिराखान रेखांकनातील तीन भूखंड दिल्लीगेट येथील भूखंड नगर भूमापन क्रमांक ७४६६, ७४६९ व ११४५१ अदला बदला प्रमाणे खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यास त्याचप्रमाणे मोबदला रक्कम रू.१०,३०,७७०/- संबंधीतांना अदा करण्यास व ५०% रजिस्ट्री खर्च रू.३१,८८०/- यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१-अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ जलतरण तलाव येथे रंगरंगोटी व इतर दुरूस्ती कामे करणेकरीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.१,४८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन दि.१ एप्रिल २००८ पासून सदरील ठिकाणी अखिल भारतीय पोलीस जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सदरील काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ संविदा चे नियम २ (२) अन्वये इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदर कामाचा खर्च सन २००७-०८ अंतर्गत इमारत देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ संविदा चे नियम २ (२) अन्वये सदरील काम इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे दि.१ एप्रिल २००८ पासून सदरील ठिकाणी अखिल भारतीय पोलीस जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या असल्यामुळे तेथील रंगरंगोटी व इतर दुरूस्ती कामे तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ संविदा चे नियम २ (२) अन्वये इरम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराने काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१-ब :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, काळा दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी तिसऱ्या वेळेस बोलविण्यात आलेल्या निविदांपैकी श्री.शेख मसुद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराच्या १८.१०% जास्त दराने करून घेण्यात येत असून सदरील कामाची मुळ निविदा रक्कम रू.५,९७,०२६/- एवढी होती.(मुळ मंजूर रक्कम रू.८,४५,४६५/- एवढी होती.) परंतु प्रत्यक्ष काम करताना इन्टॅक या ऐतिहासिक वास्तुच्या संबंधी संस्थेच्या वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या काही बदलांमुळे कामात काही अतिरिक्त बाबी होत असून यामुळे कामात रक्कम रू.१०,७८,१८७/- (निविदा रक्कमेशी तुलना करता) ची अतिरिक्त वाढ होत असून, त्यामुळे सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,७५,२१३/- (म्हणजेच पुर्वीच्या मंजुरीपेक्षा ८,२९,७४८/- एवढी वाढ होत आहे.) एवढी झाली होती. यास मा.स्थायी समिती सभा दि.२३.१०.२००७ विषय क्र.१८३ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली होती. तद्नंतर सदर कामावर प्रचंड मोठ्या प्रमाणाचे व वजनाचे दगड लावण्याचे काम करून घेण्यात आले आहे. यासाठी पुरातत्व खात्याच्या मंजूर दर विचारात घेवून दर पृथःकरण केले असता अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा रू.२,९८,६८३/- एवढी वाढ होत आहे. यामुळे सदर कामात एकूण रक्कम रू.१९,७३,८९६/- एवढी वाढ होत असून सदर कामावरील अतिरिक्त बाबींचे काम संबंधीत गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह रक्कम रू.१९,७३,८९६/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काळा दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणेच्या कामात, सदर कामावरील अतिरिक्त बाबींमुळे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.१९,७३,८९६/- ला तसेच अतिरिक्त बाबींचे काम संबंधीत गुत्तेदार श्री.शेख मसुद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान : मच्छर मारण्याचे नोव्हान औषधी दोन दोन वर्षापासून पर्चेस न करता आता विटको वॅक हे मच्छर पैदास होवू नये म्हणून फवारले जाते. पैदास झाल्यानंतर नियोजन नाही. दोन वर्षापासून शहरातील नागरीकांना मोठा त्रास होत आहे.नोव्हान औषधी का बंद केली फवारणी करणारे मशीन १०-१० वर्षापुर्वीचे आहे. ५० लिटर डिजेल देण्याएवेजी २० लिटर दिले जाते हे बरोबर नाही. रस्त्याने नागरीकांना चालू येत नाही एवढे मच्छर दोन वर्षात झालेले आहे.

श्री.मधुकर सावंत : ४० कर्मचारी तीन फॉगींग मशीन १०-१० टप्पे घेतात पुरेसे डिझेल मिळत नाही. नागरीकाच्या आरोग्याकडे लक्ष देणे महापालिकेचे कर्तव्य आहे.नवीन मशीन खरेदी करून डिझेलची पुरेशी व्यवस्था करावी.जे औषधी फवारणी होते त्यापासून मच्छर नाश होत नाही.

श्री.संजय जोशी : फोगींग मशीनला डिझेल पेट्रोलची व्यवस्था कोणत्या विभागाकडून होते. मलेरियाचा चार्ज कुणाकडे आहे.

आरोग्य वैद्य.अधि. : डिझेल पेट्रोलच्या खर्चाची जबाबदारी वार्ड अधिकारी यांचेकडे आहे त्यांना अॅडव्हान्स घेण्याचे अधिकार दिलेले आहे. फॉगींग मशीन व मॅन पावर वार्ड

| | |
|---|---|
| | अधिकारी यांना दिलेले असून मलेरिया विभगाचा ॲडीशनल चार्ज डॉ. गोसावी यांचेकडे आहे ते आयटी परीक्षेसाठी गेलेले आहे. |
| श्री.संजय जोशी | : मलेरिया विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे नागरीकांना त्रास सहन करावा लागतो सतत औषध फवारणी करण्याचे आदेशीत करावे. |
| मा.सभापती | : कोणती औषधी खरेदी केली जाते. खुलासा द्यावा. |
| वैद्यकीय अधिकारी | : तीन प्रकारची औषधी, पाण्यात अळया तयार होता. यासाठी पाण्यात औषधी टाकली जाते, घरोघरी जावून फवारणी होते. बीटेक्स, आबेट हे फॉगींगद्वारे वापर करतो. ऑईल अंडयासाठी प्रतिबंधक असते. नाल्यात साधा ऑईल टाकतात. |
| श्री.अ.रशिद खान | : फवारणी होते मच्छर मरतात का? उलट संख्या वाढते आहे. |
| वैद्यकीय अधिकारी | : ॲबेट टाकल्यानंतर मच्छर पैदास होत नाही अळया मरतात. |
| श्री.संजय सिरसाट | : गोळया पाण्यात टाकतात नाल्यात टाकत असले तर योग्य आहे काय? चुकीचे माहिती देत आहे. आरोग्य विभाग व आरसीएच विभागाची चौकशी व्हावी. मा. आयुक्त आल्यानंतर जे विषय स्थगित ठेवलेल्या विषयावर तसेच आरोग्य विभागावर चार दिवसात एक बैठक आयोजित करावी. |
| श्री.संजय जोशी | : शहरातील मच्छर ची संख्या कमी होण्याकरीता आरोग्य विभागाने दखल घेण्याच्या सुचना कराव्यात.अंबुलन्सने लोकांना घरून आणण्याचे ठराव सादर करून नये. |
| मा.सभापती | : आरोग्य विभागाच्या संदर्भात दोन-तीन दिवसानंतर बैठक आयोजित करण्यात येवून कोणती औषध फवारणी होते यावर सविस्तर चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | : माझे वार्डात हॉलसाठी कोणत्या जागेवर नेमकी एनओसी दिली आहे. |
| मा.सभापती | : मालमत्ता अधिकारी आज सभेला उपस्थित नाही. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | : श्री. कोलेले हे चुकीचे काम करीत आहे सभापतीनी आदेशीत केले होते ती जागा सोसायटीची होती. योग्य ती कार्यवाही करावी.हा तेथील नागरीकांवर अन्याय होत आहे (याच वेळी स. सदस्य सभागृहात मोठमोठयाने बोलतात ) |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : एकाच जागेवर दोन -दोन एनओसी कशी दिली जाते स. सदस्यांची भावना लक्षात घेवून योग्य ती कार्यवाही करावी.यामूळे दोन गटात वाद होत आहे त्यामूळे संबधीत सदस्य यांचे बंधु या प्रकरणात जेलमध्ये गेले आहे. |
| श्री.मधुकर सावंत | : त्या भागात अनेक ओपनस्पेस आहेत नेमकी कोणत्या जागेवर एनओसी दिली स्पष्ट खुलासा दयावा.स.सदस्य ज्या जागेवर हॉल बांधण्याची मागणी करीत आहे त्या ठिकाणी इतरांना बांधु देवू नये दुस-या ठिकाणी बांधण्याची परवानगी दयावी. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी आजच्या बैठकीला उपस्थित नसल्यामूळे पुढील बैठकीत माहिती घेतली जाईल सध्या तेथे काम बंद आहे.अशी माझी माहिती आहे प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| प्रशासकीय अधि. | : सदर ठिकाणी सकाळी काम चालू होते सामान जप्त करून महापालिकेच्या ताब्यात आहे. झाडे तोडतात तेंव्हा ते बघण्याचे काम उदयान विभागाचे आहे.उर्वरीत या विभागाचे कर्मचारी यांनी खड्डे खोदण्याचे जे काम चालू होते ते बंद केले. |
| मा.सभापती | : झाडे तोडण्याची परवानगी घेतली होती का ? |
| प्र.प्रशासकीय अधि. | : त्याबद्दल मला कल्पना नाही. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | : सोसायटीच्या लोकांनी मोठमोठी झाडे वाढीला लावलेली होती परवानगी न घेता ती तोडण्यात आली हे योग्य नाही. |
| मा.सभापती | : पुढील बैठकीत या संबधी माहिती घेवून योग्य ती कार्यवाही केली जाईल. |
| डॉ.आशा बिनवडे | : माझे वार्डात एका शाळेत काल जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमासाठी हजर होते त्याच वेळी शालेय मुलांना बुट वाटपाचा कार्यक्रमही घेण्यात आला परीक्षेची वेळ आली आता शुज वाटप करणार म्हणजे सुट्टीमध्ये देत असून नेहमी प्रमाणे वर्षाच्या शेवटी शुज देणार बालवाडी वर्गात असलेल्या मुलांना दिलेले बुट अक्षरशः दोन वर्षाच्या मुलांना येतील असे दिले.७० शुज पुर्णतः तसेच पडून आहे ७ ऐवजी किमान ९ नंबरचा शुज दयावयास पाहिजे. तसेच काही शुज बॉक्स रिकामे होते असे काम शिक्षण विभागाचे होत असेल तर योग्य नाही. चौकशी व्हावी. |

शिक्षणाधिकारी : या संबधीची संचिका भांडार विभागाकडून प्रोसेसमध्ये असते.शिक्षण विभागाकडून आकडेवारी दिली जाते त्यानुसार एजन्सीचे लोक शाळेत पुरवठा करतात व शिक्षण विभागाचे कर्मचारी वाटपासाठी केवळ मदत करतात.ही शुज लहान झाले काही बॉक्स रिकामे येतात ते का येतात याची सर्व जबाबदारी भांडार विभागाची आहे.

डॉ. आशा बिनवडे : बालवाडी साठी कोणत्या नंबरचा शुज दयायला पाहिजे हेच माहित नसेल तर खरेदी करण्याला अर्थ काय ?

श्री.संजय जोशी : भांडार विभागाची जबाबदारी असेल तरी शिक्षणाधिकारी यांचे समाधान झाले का ?म्हणजे अदयापपर्यत मुख्याध्यापकानी कळविलेच नाही.

शिक्षणाधिकारी : मुख्याध्यापकाने कळविलेले नाही गेल्या १० तारखेपर्यत बुट वाटप झालेले आहे. ज्यांचे तक्रारी असेल त्यांनी सात दिवसाच्या आत तसा अहवाल द्यावा असे पत्रच काढलेले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझे वार्डात शाळेत तीन वर्षापूर्वी मुलाच्या पायाचे माप घेतले होते.त्यानंतर पायाची साईज वाढली असेल याचा विचार करून बुट दिले का? काही बॉक्स रिकामे निघाले भांडार विभागाने चोरी केली असे शिक्षण विभागाचे मत आहे काय?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खरेदी कुणाकडून होते शाळेत ज्यांनी पाठविले त्यांचेकडून खुलासा होणे आवश्यक आहे.बुट उशीर येण्याचे कारण काय, किती खरेदी केले माप केंव्हा घेतलेले होते.

डॉ.आशा बिनवडे : विद्यार्थ्यांच्या पायाचे माप घेतले जाते एजन्सीला ऑर्डर दिल्यानंतर एक वर्षानी बुट येत असेल तर पायाची साईज वाढणार शंका नाही. असे होत असेल तर योग्य नाही बुट घ्यायला कुणी तयार नाही. असेच होत राहिल्यास पालकांचा रोष वाढेल यास जबाबदार कुणाला धरणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : उशीरा बुट का आले केंव्हा ऑर्डर दिली केंव्हा आले त्यांचेवरही कार्यवाही करावी.उशीर झाल्यास मुलाचे पाय वाढणारच आहे.

डॉ. आशा बिनवडे : ऑर्डर केंव्हा दिली होती एजन्सीने वेळेवर पुरवठा केला किंवा काय, उशीर झाला असेल तर काय कार्यवाही केली किंवा करणार आहे किती पेमेन्ट दिलेले आहे.याची सखोल चौकशी करून संबधीत एजन्सीचे बील थंबविण्यात यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वर्ग-४ वे कर्मचारी यांना दोन गणवेशासाठी चार मीटर कपडा देण्यात आला त्यात गणवेश होत नाही अर्धा मीटर कपडा का कमी दिला.एका कर्मचा-यासाठी किती कपडा देण्याचे निश्चित केले होते कटपीस का दिलेले आहे.त्यात गणवेश होत नाही

श्री.अ.रशिद खान : शिक्षण विभागात बावीस्कर शिक्षक यांनी त्यांचे मुलास व सुनेस विष पाजून मारले त्यांना सात दिवस पोलीस कस्टडी झाली पोलीसांचा रिपोर्ट आला संचिका कुणाच्या तरी दबावामूळे पुढील कार्यवाहीसाठी का थांबून आहे खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : त्यांचे कौटुबिंक काय वाद झाला माहित नाही परंतू जे समजले त्यानुसार त्यांचेवर कार्यवाही सुरू केली ठाणे वसई मुंबई पोलीस स्टेशन मधून त्यांचे रेकॉर्ड मागविलेले आहे. त्यात ते दोषी असतील त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.अ.रशिद खान : पोलीसांचे पत्र एक महिण्यापूर्वीच आले त्यात किती दिवस कस्टडीत होते उल्लेख असेल. पुन्हा रिपोर्ट मागविण्याची गरज नाही.

शिक्षणाधिकारी : दुरध्वनीवरून माहिती घेतली जाईल जे पत्र आले त्यात त्यांना किती दिवस पोलीस कस्टडीमध्ये होते उल्लेख नाही. त्यामूळे पुन्हा कार्यवाही केली आहे.

श्री.संजय जोशी : पत्र आले त्यात काय उल्लेख आहे खुलासा करावा. आलेले पत्र मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले होते का?

शिक्षणाधिकारी : पत्र आल्यानुसार कार्यवाहीसाठी संचिका चालू आहे. त्या संबधीची सचिंका मागवून घेत आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : मालमत्ता अधिकारी आलेले आहे नंदनवन कॉलनीच्या एनओसी बाबत खुलासा घ्यावा.

मालमत्ता अधिकारी : खेळाच्या मैदानच्या बाजूला जी जागा आहे त्या जागेवर एनओसी मागवीलेली होती. त्यानुसार संचीका नगररचना विभागाकडे पाठवून एनओसी दिल्याचे पत्र दिले होते.

श्री.संजय जोशी : दोन जागा आहे दोन्ही प्रोजेक्ट फीजीकल होवू शकतात का?

मालमत्ता अधिकारी : होवू शकतात.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : पुर्वीच्या जागेवर हॉलचे काम चालू आहे. नंदनवन कॉलनीतील सोसायटीचे लोक कोर्टात जाणार आहे.एनओसी दिली यात स्थायी समीतीचा अपमान होणार आहे.एनओसी कोणत्या जागेवर देण्यात आली याचा खुलासा घ्यावा.

मालमत्ता अधिकारी : नंदनवन कॉलनीतीलच जागा आहे.

श्री.संजय जोशी : नगरपालीकाच्या नगररचना विभागाच्या रूल प्रमाणे हे आरक्षणाचे होते. ओपनस्पेस सोडून ती जागा आहे ॲमेलीटी प्लॉटमध्ये दोन प्रोजेक्टला परवानगी देवू शकतो का ?

मालमत्ता अधिकारी : ॲमेलीटी प्लॉटमध्ये दोन प्रोजेक्टला एनओसी देवू शकत नाही असे माझे मत आहे.त्या भागात ओपनस्पेसही आहे.

मा.सभापती : दोन प्रोजेक्टला एनओसी देता येत नव्हती तर का दिली.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : एनओसी कूठे दिली. माझे माहीती प्रमाणे एकाच जागेवर दोन एनओसी दिली.

मालमत्ता अधि. :अभिप्राय मागवीला होता अमेलीटी प्लॉटवरच एनओसी दिली आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : एनओसी दिली त्याची प्रत आहे वाचून दाखवावी.त्यात सर्व गोलमोल आहे. चुकीच्या आरोपामुळे माझे बंधु जेलमध्ये आहे.

मालमत्ता अधिकारी : मागील स्थायी समितीमध्ये रद्य करण्याचा निर्णय झाला सदर संचीका मा.आयुक्ताकडे निर्णयास्तव दिली आहे.

मा.सभापती : जे मा.मंत्री महोदय यांचे निधीतून काम सुरू होणार आहे त्यांना त्याच जागेवर एनओसी दिली की दुस-या जागेवर आहे.

शिक्षणाधिकारी : विभागप्रमुखांना दाखवले आहे.

मालमत्ता अधिकारी : ज्या जागेवर हॉल बांधण्याचे मान्य केले ती संचिका नगर रचना विभागाकडे पाठविली आहे.

श्री.संजय जोशी : दोन प्रोजेक्ट होऊ शकतात का?

मालमत्ता अधिकारी : होऊ शकतात, एनओसी दिली आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : जेथे काम सुरू आहे ते ठिकाण कोणते आहे.

मालमत्ता अधिकारी : माझे माहिती प्रमाणे ॲमेनिटी प्लॉट आहे.

श्री.संजय जोशी : पुर्वीची एनओसी कोणत्या विभागाने दिली. एक एनओसी मालमत्ता विभाग तर एक वेळेस नगररचना विभागाने परवानगी दिली असावी.

मालमत्ता अधिकारी : दोन्ही वेळेस नगररचना विभगाने सम्मती दिली.

श्री.संजय जोशी : पहिली एनओसी फक्त नगररचना विभागाने घेतली दुसरी मालमत्ता मार्फत नगररचना विभागाकडून घेतली.असे असेल तर पहिल्यांदा एनओसी दिली त्याची कल्पना मालमत्ता विभगास होते का ?

मालमत्ता अधिकारी : एक वाचनालय, क्लब आणि खुली जागा असे आहे. आम्ही वाचनालयाच्या जागेवर दिले. पुर्वीच्या एनओसीची कल्पना या विभागाला नव्हती.

श्री.पुरूषोंत्तम ठाकूर : १९६५ ची ती सोसायटी आहे.हा गंभीर विषय आहे. यात सभागृहाचा अपमान आहे एक तर एनओसी एकाच जागेवर दोन वेळेस दिली हे माहित नाही की जागा आरक्षणाची की खुली आहे.

(याच वेळी स. सदस्य सभागृहात मोठमोठयाने अधिका-यावर आरोप प्रत्यारोप करतात.)

मा.सभापती : आताच शिक्षण विभागाच्या संदर्भात विदयार्थ्यांना बुट हे कमी मापाचे होतात चर्चा झाली त्या संबधीत जोपर्यत स. सभासदांचे समाधान होत नाही तोपर्यत संबधीत एजन्सीला बिल अदा करू नये.

श्री.हिम्मतराव दाभाडे : २८-२-२००८ च्या बैठकीत मी प्रश्न केला होता धार्मीक स्थळास टॅक्सलावतायेतो का? याचा खुलासा त्या बैठकीत केलेला नाही. आता देण्यात यावा.

मालमत्ता अधि. : धार्मीक स्थळाला टॅक्स लावता येत नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : फुलेनगरला मैत्री विहारला टॅक्स कशाच्या अधारे लावण्यात आला १४-३-२००८ रोजी मी पत्र दिलेले आहे.

मालमत्ता अधिकारी : स. सदस्य स्वतः माझेकडे आले होते वार्ड कार्यालयात काही कर्मचारी पाठवले आहे एक दोन दिवसात रेकॉर्ड मिळेल.

मा.सभापती : टॅक्स आकारणी झली असेल तर तो रद्य करून उदयाच माझेकडे रिपोर्ट करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : महापालिकेत नवीन कर्मचारी भरती झालेली आहे का ११२४ ची भरती ही मा.न्यायालयाच्या निदेशानुसार घेतलेली नाही मा. न्यायालयाचा अपमान केलेला आहे.

मा.सभापती : ११२४ भरती प्रकरणाची चौकशी चालू आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : कामगार अधिकारी यांचेकडे एक कर्मचारी यांना दै. वेतनावर घेतले अशी माहिती आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती घेतली जाईल.
(याच वेळी स. सदस्य श्री.पुरूषोत्तम ठाकूर हे एनओसी बाबत स्पष्ट खुलासा व्हावा म्हणून मोठमोठयाने मागणी करतात.)

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : माझा खुलासा केला नाही तर मी वरून जीव देईल.

श्री.संजय सिरसाट : गेल्या दीड तासापासून एक स. सदस्य एनओसी बाबत बोलत आहे याचे गार्भीर्य लक्षात आले असेल तर एकाच ओपनस्पेसवर दोन एनओसी दिली असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. २१ लक्षचे कामाचे टेंडर झालेले असून अर्थसंकल्पात त्याची तरतूद आहे. ते काम करण्यास लोक विरोध करीत आहे त्यातच अधिकारी यांनी दुसरी एनओसी दिलेली आहे. दोन एनओसी एकाच जागेवर दिल्यामूळे दोन समाजामध्ये तेड निर्माण झाली याचा खुलासा आता मा. आयुक्तांच्या टैंबलवर संचिका जरी असेल परंतू हा प्रश्न अनेक दिवसापासून चालू आहे. आजही साजवार्ता वृत्त्पत्रात बातमी आलेली आहे.

मा.सभापती : दोन्ही जागा वेगवेगळया आहेत की एकच जागा आहे.

मालमत्ता अधिकारी : दोन्ही जागा वेगवेगळया आहे.

मा.सभापती : दोन्ही जागा वेगवेगळया आहे तसे पत्र स.सदस्य श्री.पुरूषोत्तम ठाकूर यांना देवून त्याची प्रत माझेकडे द्यावी. महापालिकेची ज्या ठिकाणी परवानगी आहे त्याच ठिकाणी हॉलचे काम व्हावे. त्याचीही एक प्रत मला व स. सदस्य श्री. ठाकूर यांना देण्यात यावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद